MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष तेविसावे / अंक ७ / जुलै २०२२

## संपादकीय

### बोलीभाषेचे संवर्धन

जगात एकूण ७००० बोलीभाषा आहेत. निसर्गाने मानवाला एक प्रभावी असे स्वरयंत्र दिले आहे. तिचा उपयोग करून वेगवेगळ्या प्रकारचे ध्वनी निर्माण करता येतात. त्यातून शब्द निर्मिती होते. त्यातील काही शब्द नामोल्लेख करतात, काही शब्द कृती दर्शवितात तर काही शब्द गुणवैशिष्ट्ये सांगतात. या शब्दाचा योग्य क्रम लावून वाक्यांची निर्मिती होते. जगाच्या विविध भागातील वेगवेगळ्या गटांनी विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी भाषेचा विकास करून घेतला आहे. त्या भाषांमध्ये विशिष्ट अर्थ दर्शविणारे वाक्प्रचार निर्माण केले आहेत. भाषा हे अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन आहे. आपल्याला जी भाषा चांगली येते तिच्या मदतीने आपण आपल्या भावना, विचार अधिक प्रभावीपणे व्यक्त करू शकतो. म्हणूनच मातृभाषेचे मानवाच्या जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ही भाषा मुलाला नकळत अवगत होते. ती वापरताना त्याला कुठलीच अडचण येत नाही. आपली भाषा बोलणाऱ्या व्यक्तीशी आपले लगेच बंध निर्माण होतात. परक्या भूमीवर आपली भाषा बोलणारी व्यक्ती आढळली की नकळतपणे तिच्याविषयी आपुलकी वाटते.

जगात बोलल्या जाणाऱ्या अनेक भाषांमधील फारच थोड्या भाषा लेखी स्वरूपात व्यक्त करता येतात. इंग्रजी ही जगात सर्वत्र वापरली जाणारी भाषा आहे. २६ मूळाक्षरांच्या आधारे वेगवेगळे शब्द तयार करून ते लेखी स्वरूपात सुरक्षित ठेवता येतात. यातूनच ग्रंथसंपदा निर्माण होते. इंग्रजी भाषेला समृद्ध भाषा (Highly Resourced Language) असे म्हटले जाते. हीच स्थिती युरोपातील आणखी काही भाषांची आहे. त्यामध्ये समावेश होतो तो फ्रेंच, जर्मन, डॅनिश, स्पॅनिश, ग्रिक आणि लॅटिन या भाषांचा. या भाषांमध्ये पुरेशा प्रमाणात ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. युरोप बाहेरील देशांचा विचार केला तर असे आढळते की, तिथेदेखील काही समृद्ध भाषा उपलब्ध आहेत. जसे हिंदी, मँडारिन, जपानी, सिंहली, उर्दू इत्यादी. या भाषांमध्ये कमीअधिक प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. परंतु जगात अशा अनेक भाषा आहेत की, त्यांचे अस्तित्व केवळ बोलण्याच्या स्तरावर सीमित आहेत. त्यांची मुळाक्षरे उपलब्ध नाहीत. त्यामुळे, त्या भाषेत लेखी साहित्य निर्मिती होत नाही. जगात सगळीकडे प्रमाण भाषेचे प्रस्थ वाढत आहे.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

त्यामुळे बोलीभाषेचा वापर कमी कमी होत आहे. एखाद्या बोलीभाषेचा वापर असा कमी होत गेला तर ती भाषा नामशेष होण्याची शक्यता आहे. असे होऊ नये यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. अनेक संस्था असा प्रयत्न करताना दिसतात.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तांत्रिक शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यासाठी देशाच्या वेगवेगळ्या भागांत भारतीय प्राद्योगिकी संस्था (Indian Institute of Technology, IIT) उभारण्यात आल्या. या संस्थेने अनेक तंत्रज्ञ तयार केले आहेत. या संस्थेत शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी आपली एक संघटना बनविली आहे. त्यांचे मुख्यालय बंगलोर येथे असून या संघटनेचे नाव आयआयटी ॲल्युमिनाय क्लब बंगलोर (IIT -lumni Club Bangalore, IIT-CB) असे आहे. या संघटनेच्या वतीने अनेक संशोधन आणि शैक्षणिक प्रकल्प घेतले जातात. त्यातील एक प्रकल्प आहे बोलीभाषेचे संवर्धन करण्याचा..

आयआयटीएसीबी या संघटनेच्या वतीने नियमितपणे माहितीपूर्ण व्याख्यानांचे आयोजन केले जाते. त्यातील एका व्याख्यानात या संघटनेच्या एका सभासदाने बोलीभाषा संवर्धन करण्याचा दृष्टीने कोणते प्रयत्न केले जात आहेत याचा गोषवारा सादर केला. त्यांनी आपल्या कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून घेतला आहे. समृद्ध भाषेतील माहितीचे ते प्रथम राज्यभाषेत रूपांतर करून घेतात. त्याला ते जोडभाषा (Contact Language) म्हणतात. त्यानंतर राज्यभाषेतून ते बोलीभाषेत माहितीचे रूपांतर करून घेतात. उदाहरणच द्यायचे झाले तर असे म्हणता येईल की, इंग्रजी भाषेत उपलब्ध असलेल्या माहितीचे ते प्रथम कन्नड भाषेत रूपांतर करतात. नंतर कन्नड मधून आदिवासी लोक वापरत असलेल्या बोलीभाषेत रूपात करतात. हे रूपांतर बोलण्याच्या स्वरूपात असते. अशा पद्धतीने बोलीभाषेत ध्वनीमुद्रित केलेली माहिती उपलब्ध होते. हे ध्वनी मुद्रण संकेतस्थळावर अनंत काळापर्यंत सुरक्षित ठेवता येते. कर्नाटक राज्यातील बोलीभाषेसोबतच ओडिशा राज्यातील एका आदिवासी बोलीभाषेत माहितीचे रूपांतर करण्याचे काम चालू आहे. या कामाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. म्हणून ते कामाचे स्वरूप विस्तारण्याचा विचार करीत आहेत.


मराठी ही महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा आहे. देवनागरी लिपीत ती लिहिली जाते. मागील अनेक शतकात या भाषेत विपुल असे ज्ञान साहित्य निर्माण झाले आहे. महाराष्ट्रात मराठी खेरीज इतर अनेक भाषा बोलल्या जातात. बडोदा येथील एका संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले की, महाराष्ट्रात मराठी खेरीज आणखी ३८ भाषा बोलल्या जातात. यातील बहुतेक भाषा असमृद्ध भाषा या गटात मोडतात. त्यांना लिपी नाही. त्यामुळे त्या भाषांमध्ये लिखित स्वरूपातील साहित्य नाही. अहिराणी, गोंडी, पारधी, कैकाडी या भाषांचा या गटात समावेश करता येईल. समाजाच्या ठरावीक गटातील लोकच त्यांचा वापर करतात. ही संख्या दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. कालांतराने या भाषेचा वापर करणाऱ्या लोकांची संख्या नगण्य होईल. ते होण्यापूर्वी या बोलीभाषेत त्या समाजाला उपयोगी पडेल अशी माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मराठी भाषा संचालनालयाने या बाबींचा गांभीर्याने विचार करावा असे सुचवावेसे वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष तेविसावे/अंक ७/जुलै २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक १ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे! (भाग - २) | सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | सर्वस्पर्शी कालिदास | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | ८ |
| ४) | शेअर बाजाराविषयी काहीतरी... | चन्द्रशेखर टिळक | ११ |
| ५) | शिवराज्याभिषेकाचा आनंद सोहळा | संकेत कुलकर्णी | १५ |
| ६) | 'निर्मल-वारी' अभियान | तुषार दामगुडे | १६ |
| ७) | पुस्तक परिचय : मोठी तिची सावली | नरेंद्र गोळे | १९ |
| ८) | पूर्व विदर्भातील अश्मवर्तुळांचे गूढ विश्व | दिलीप नारायण वंडलकर | २२ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे!

**(भाग – २)**

*अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

स्वामी समर्थांचे वैशिष्ट्य म्हणजे ते जात व धर्मावरून भेदभाव करत नसत. याची प्रचिती एका गोष्टीवरून येते की, ते कुठल्याही जातीच्या व धर्माच्या लोकांच्याकडे भोजन करत असत. यात शुद्र व यवनांचा देखील समावेश होता. स्वामीं एकदा 'माझी जात चांभार, आई व बाप महार' असे म्हणाले होते. चांभार व महार या दलित जाती. पूर्वापारपासून मांग, महार, चांभार या जातींना गावकुसाबाहेर राहावे लागले. त्यांची गणना अस्पृशांमध्ये झाली. या जातींचा स्पर्श वर्ज्य मानला जात असे. त्यांना गावातील मंदिरांमध्ये प्रवेश नसे. आजही ग्रामीण भागात या समाजातील लोकांना बहुतांशी मंदिरांमध्ये जाऊ दिले जात नाही. त्यामुळे साधारणपणे दीडशे वर्षांपूर्वी स्वामींनी 'माझी जात चांभार व आई–वडील महार' म्हणणे फार महत्त्वाचे ठरते. तसेच, ज्या शुद्रांना सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ लेखले जात असे त्यांच्याकडे जेवण करणे हे स्वामी महाराज सर्वांना 'आपली म्हणजेच देवाची समान लेकरे' मानत असत असे म्हणणे वावगे ठरू नये.

श्री स्वामी समर्थ हे बंगाल, कलकत्ता, हरिद्वार, केदारेश्वर, गोदावरी तट, हैदराबाद, मंगळवेढा, पंढरपूर, बेगमपूर, मोहोळ, सोलापूर असा प्रवास करत अक्कलकोटला आले हे पाहिलेलेच आहे. यावरून त्यांना भारतवर्षीतील अनेक भागांची व पवित्र स्थळांची, तसेच देवस्थानांविषयीची माहिती होती हे निदर्शनास येते. स्वामींनी अक्कलकोटला आपला कायमस्वरूपी मुक्काम ठेवला. परंतु त्यांचा दृष्टांत भक्तगणांना गिरनार, तसेच गाणगापूर येथे होत असे व भक्तमंडळी अक्कलकोटास समर्थांच्या दर्शनास येत असत. मुंबईतील ठाकूरद्वार भागातील ठाकूरदासबुवा यांनी देखील अक्कलकोटला स्वामींचे दर्शन घेतले होते व त्यांच्यावर स्वामींची कृपा झाली होती.

ठाकूरद्वार हे मुंबईतील एक ठिकाण असून, हे तेथील मराठी लोकांची वस्ती, तसेच दागिने बनविणाऱ्या सोनारांसाठी प्रसिद्ध आहे. असो. ठाकूद्वारला हे ठाकूरदासबुवा होऊन गेले. त्यांना श्रीकृष्णवुवा असेदेखील म्हणत असत. हे ठाकूरदासबुवा मोठे दत्तभक्त होते. या ठाकूरदास ऊर्फ श्रीकृष्णबुवांबाबत असे वर्णन आलेले आहे की, ते सुंदर कीर्तनकार होते. तसेच ते नित्यनेमाने नरसोबाची वाडी व गाणगापूर येथे जात असत. आपण पाहिलेलेच आहे की, ही दोन ठिकाणे दत्त संप्रदायातील भक्तांच्या हृदयातील पवित्र स्थळे आहेत. याचे कारण असे की, येथे दत्तगुरूंचा दुसरे अवतार मानले गेलेले श्री नृसिंहसरस्वती यांचा एकेकाळी येथे वास होता. अशाप्रकारे ठाकूरदासबुवा दत्तभक्तीमध्ये तल्लीन होते. ते गृहस्थाश्रमी होते. मानवी आयुष्यात असे अनेकदा घडलेले आढळते की, सर्वकाही ठीक चालू असताना अचानकपणे ध्यानीमनी नसलेले संकट कोसळते व आपल्या आयुष्यास हादरा बसतो. परंतु अशा प्रसंगांना कणखरपणे तोंड देऊन, त्यांचा पराभव करून, आयुष्याला कलाटणी देऊन ते पूर्वपथावर आणून यशस्वीपणे जगायचे असते. अनेकांचा असा दृढ विश्वास आहे की, अशावेळी अध्यत्म व गुरूकृपा बरीच मदत करून जाते. तर

ठाकूरदासबुवांवर देखील आभाळ कोसळले. त्यांना कुष्ठरोग झाला. त्यांचे तोंड व शरिराचे इतर भाग पांढरे पडू लागले. त्याकाळात कुष्ठरोग झाल्यावर मनुष्य उदासीत जात असे व समाजाचा अशा व्यक्तींकडे बघण्याचा दृष्टीकोनदेखील बदलत असे. कुष्ठरोग्यांची ही दयनीय स्थिती पाहूनच विसाव्या शतकात बाबा आमटे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात कुष्ठरोगींसाठी नंदनवन फुलविले व त्यास 'आनंदवन' असे नाव दिले. आजही आनंदवनाचे कार्य चालू असून त्याची जबाबदारी बाबा आमटेंचे ज्येष्ठ पुत्र डॉ. विकास आमटे व त्यांचे कुटुंबीय पाहात असतात. येथे कुष्ठरोगींची मोठी वसाहत असून तिला ग्रामपंचायतीचा दर्जा आहे. येथे कुष्ठरोगींना फक्त बरेच केले जात नाही, तर त्यांना जीवनात आयुष्यात पुन्हा एकदा जोमाने उभे राहण्याचे जणू शिक्षणच दिले जाते. हे ठिकाण म्हणजे आधुनिक काळातील पवित्र स्थळ होय असे म्हणणे वावगे ठरू नये. त्यामुळे सामाजिक बांधिलकी असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने अशा ठिकाणांना भेट देऊन अशा समाजाभिमुख कार्यांना आपापल्या परीने हातभार लावला पाहिजे असे म्हणणे सयुक्तिक ठरेल. असो. तर आपला मुळ मुद्दा होता की, श्रीकृष्णदासबुवांना कुष्ठरोग झाला व जणू त्यांचे संसारातून मनच उडून गेले. त्यांनी असे ठरविले की, आता आपण काशी या पवित्र ठिकाणी जाऊन भक्तीत रममाण व्हावे व उर्वरित आयुष्य तेथेच व्यतीत करावे. मात्र, काशी क्षेत्रास जाण्यापूर्वी त्यांनी एकदा गाणगापूरला जाण्याचा निर्धार केला. त्याप्रमाणे ते गाणगापुरास आले. तेथे त्यांनी गुरूंच्या पादुकांचे दर्शन घेतले. सोबत त्यांनी गुरूला वाहण्यासाठी कस्तूरी नेली होती. परंतु ते कस्तूरी वाहण्यास विसरले. श्रीकृष्णबुवाना गाणगापूरला दृष्टांत मिळाला की, त्यांनी अक्कलकोटला जाऊन स्वामी समर्थांचे दर्शन घ्यावे. त्यामुळे श्रीकृष्णबुवा अक्कलकोटला गेले. तेथे त्यांनी स्वामी समर्थांचे दर्शन घेतले असता स्वामींनी त्यांना आपली कस्तूरी आपणास द्यावी असे म्हटले. तेव्हा श्रीकृष्णबुवांच्या लक्षात आले की, ते जी कस्तूरी गाणगापूरास वाहणार होते ते विसरले, परंतु स्वामींनी हे आपल्या शक्तीच्या बळावर जाणले. त्यामुळे त्यांची खात्री पटली की, स्वामी हे दत्त अवतारी महान पुरुष आहेत. त्यांनी स्वामींना कस्तूरी दिली तेव्हा स्वामींनी ती लहान मुलांमध्ये वाटून टाकली. हा प्रसंग अक्कलकोटला घडला तेव्हा स्वामी हे, समाजाने ज्यांची गणती हीन म्हणून केली आहे अशा एका वेश्येला दर्शन देऊन तिचा जणू उद्धारच करत होते. यावरून पुन्हा एकदा प्रचिती येते की, स्वामी कुठलाही भेद न करता सर्व भक्तमंडळींना समान वागणूक देत असत. या प्रसंगानंतर श्रीकृष्णवुवा अक्कलकोटास राहून स्वामींच्या भक्तीत तल्लीन झाले. सोबत त्यांची धर्मपत्नी सौ. राधाबाई या देखील होत्या. एकेदिवशी स्वामी समर्थांनी धुनीतील एक जळलेले लाकूड श्रीकृष्णबुवांवर भिरकावले. तेव्हा बुवांची खात्री पटली की, हीच त्यांची कुष्ठरोग मुक्त होण्याची वेळ आहे. श्रीकृष्णबुवांनीं ते लाकूड उगाळण्यास सुरुवात केली व त्यात पवित्र गाणगापूर क्षेत्रीचे भस्म मिसळून आपल्या शरीरावर लावू लागले. त्यामुळे त्यांचा कुष्ठरोग बरा होण्यास मदत झाली. या प्रकारामुळे स्वामी समर्थ एक अलौकिक पुरुष होते हे लोकांच्या ध्यानात आले असावे असे म्हणणे वावगे ठरू नये. ठाकूरद्वारबुवांवर स्वामींनी अजून एक मोठी कृपा केली. त्यांच्या पत्नी सौ. राधाबाई यांनी महाराजांकडे पुत्रप्राप्ती होण्याची प्रार्थना केली. त्यासरशी स्वामींनी आपली टोपी राधाबाईच्या पदरात म्हणजेच ओटीत टाकली. याचा चमत्कार असा झाला की, श्रीकृष्णबुवा व सौ. राधाबाई या दांपत्यास बारा महिन्यानंतर पुत्ररत्न झाले. त्यांचे नाव गुरूनाथ असे ठेवले गेले. हा गुरूनाथ देखील स्वामी भक्त बनला. अशाप्रकारे कुष्ठरोगामुळे एकप्रकारे वैफल्य येऊन काशीस कायमस्वरूपी जाऊ इच्छिणाऱ्या कृष्णबुवा ऊर्फ ठाकूरदासबुवा यांचा गृहस्थाश्रमी मळा स्वामी समर्थांच्या कृपाशीर्वादाने पुन्हा

कलियुग नाही मतलबी युग चालू आहे.

एकदा फुलला. ठाकूरद्वार बुवांनी वर नमूद केलेल्या मुंबईतील ठाकूरद्वार येथे स्वामींच्या पादूकांची स्थापना केली व ते मनोभावे स्वामी समर्थांच्या पूजेत व भक्तीत सदा लीन असत.

स्वामींच्या दर्शनासाठी अक्कलकोटास अनेक प्रभावशाली लोक येत असत. यात मामलेदार, न्यायाधीश, फौजदार व तसेच अक्कलकोट संस्थानचे राजे यांचा देखील समावेश होता. अशा व्यक्तींचा सुद्धा वेळ पडल्यास स्वामी पाणउतारा करण्यास मागेपुढे पाहत नसत. स्वामींच्या भक्तमंडळीत यवन म्हणजेच मुस्लिमांचा देखील समावेश होता असे आपल्या वाचनात येते. येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते व ती ही की, दत्तसंप्रदायाचे हे एक वैशिष्ट्य आहे की, या संप्रदायात हिंदू-मुस्लीम मेळ पाहावयास मिळतो. या संप्रदायात मुस्लीम व्यक्तींचा सहभाग कसा होता हे स्वामींच्या यवन भक्तावरून लक्षात येते. येथे प्रसिद्ध अशा माहूर या पवित्र तीर्थक्षेत्राचा उल्लेख केल्यास सयुक्तिक ठरेल. माहूरचा एक महत्त्वाचे दत्तक्षेत्र म्हणून महिमा आहे. येथे महानुभाव पंथियांचे देवदेवश्वरी हे दत्तस्थान असून या सोबतच रेणूकामाता, अनसूयामाता व श्री दत्तात्रेयांची मंदिरे आहेत. देवदेवश्वरी हे ठिकाण माहूर गावात आहे व रेणूकामाता, अनसूयामाता व दत्तात्रेयांचे मंदिर येथील डोंगरांच्या माथ्यावर आहे. येथे दत्तभक्त वर नमूद केलेल्या सर्व क्षेत्रांचे दर्शन करतात. सोबतच शेख फरीदाचे देखील आवर्जून दर्शन घेताना दिसतात. असे म्हटले जाते की, शेख फरीद हे एक निस्सीम दत्तभक्त होते व ते दत्तात्रयांना आपला गुरू मानत असत.

आपण असा उल्लेख केला की, स्वामी समर्थ मंगळवेढ्यास देखील होते. मंगळवेढा हे ठिकाण दक्षिण महाराष्ट्रातील सोलापूर या जिल्ह्यात आहे. या शहराचा इतिहास वैभवशाली आहे. मंगळवेढ्यावर चालूक्य व कलचूरी सारख्या हिंदू राजघराण्यांचे राज्य होते. नंतरच्या काळात मंगळवेढ्याने बहामनी, तसेच मुघलांचे सुद्धा राज्य होते. इसवीसनाच्या पंधराव्या शतकात बहामनी राजवटीदरम्यान येथे भुईकोट किल्ला बांधला गेला. तसेच येथे महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज व मोगल सरदार जयसिंग यांची भेट झाल्याचे उल्लेख आढळतात. मंगळवेढा ही खऱ्या अर्थाने पवित्र अशी संतभूमी आहे. येथे दामाजी पंत, चोखामेळा, कान्होपात्रा, तसेच माध्वाचार्यांच्या परंपरेतील आचार्य जयतीर्थ सुद्धा मूळचे मंगळवेढ्याचेच. मंगळवेढ्यास बहामनी काळात सामान्य लोकांसाठी दामाजी पंतांनी ज्वारीची पेवे लुटली होती. या संतांसोबतच येथील मौनीबुवा, गोविंदबुवा, बाळकृष्णवुवा, शिवदास महाराज बाखरीकर, लतीफबुवा आदी महान संतमंडळी होऊन गेली. या गावात संत दामाजी व संत चोखामेळांच्या मंदिरांव्यतिरिक्त गणपती, महादेव, भैरव आदी देवतांची मंदिरे तसेच गैवीसाहेबांचा दर्गा असल्याचे उल्लेख आढळतात. मंगळवेढा हे शहर ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध असून येथे जुन्या वास्तुंचें अवशेष, नाणी व शिलालेख सापडले आहेत. येथे बह्मदेवाची मूर्ती सापडल्याची माहिती मिळते. संत दामाजीने जेथे ज्वारीचे कोठार लुटले त्या जागेस गंगा-जमुना जागा म्हणून संबोधले जाते. संत चोखामेळा यांच्या मृत्यूची जागा देखील मंगळवेढ्यात आहे. संत चोखामेळा हे अस्पृश्य म्हणून हिणवल्या गेलेल्या महार या जातीत झालेले. त्यांनी आयुष्यभर विठ्ठल भक्ती केली व अजरामर अभंग रचले. त्यांचा ऊसाच्या डोंगरांच्या व ऊसाच्या रसाच्या माध्यमातून व्यक्तीचे अंतरंग व बाह्यअंग उलगडून दाखवणारा अभंग पूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे:

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलीया रंगा ।।१।।
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलीया रंगा ।।२।।
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगें ।
काय भुललासी वरलिया रंगें ।।३।।

---

माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात. एक म्हणजे वाचलेली पुस्तके आणि दुसरी भेटलेली माणसे.

चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा

तर अशा मंगलमय मंगळवेढ्याला स्वामी समर्थांचा देखील पदस्पर्श झालेला होता. त्यामुळे मंगळवेढा हे ठिकाण वरील संतांप्रमाणेच अक्कलकोटकर महाराजांचे म्हणजेच स्वामी समर्थांचे मंगळवेढा म्हणून सुद्धा प्रसिद्ध आहे.

पंढरपूर विषयी मराठी माणसाच्या मनात एक वेगळेच प्रेम आहे कारण येथे महाराष्ट्राचा लोकप्रिय विठोबा म्हणजेच पांडुरंगाचे मंदिर आहे. अवघा महाराष्ट्र आषाढी एकादशी व कार्तिक एकादशीच्या दिवशी पंढरपुरास विठ्ठलाच्या दर्शनास लोटतो. आषाढी एकादशीला विठोबाची पूजा करण्याचा मान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना असतो. ते या दिवशी सपत्नीक विठोबाची पूजा करतात. पंढरपूरचा विठोबा म्हणजे मराठी व कानडी संस्कृतीचा सुंदर मेळ आहे. मराठी लोकांप्रमाणेच कर्नाटकातील कानडी बंधू-भगिनी सुद्धा मोठ्या प्रमाणात पांडूरंगाचे दर्शन घेतात व पूजा करतात. याबाबतीत संत ज्ञानेश्वरांच्या अभंगातील खालील ओळी प्रसिद्धच आहेत:

कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु ।
येणे मज लाविले वेधीं ।।

या अभंगाला पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी संगीतबद्ध केले आहे व सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी आपल्या सुरेल आवाजात तो गायिका आहे. तर अशा पवित्र गावांना भेटी देत स्वामी समर्थ अक्कलकोटला आले व ते कायमस्वरूपी तेथीलच झाले.

स्वामींचा स्वभाव थोडा तापट व रागीट होता. परंतु त्यांच्या रागातूनही समर्थ भक्तांना कृपादृष्टीचा लाभ देत असत अशी आजही स्वामी भक्तांची ठाम श्रद्धा आहे. आजही स्वामींचा अवतार आपल्यामध्येच वावरत आहे व ते सदैव कठीण प्रसंगांमध्ये आपली साथ करत असतात अशी भावना त्यांच्या भक्तगणांमध्ये आढळते. आजही समाजातील गरिबी, मध्यमवर्गीय, तसेच श्रीमंत स्तरातील लोक अक्कलकोटला स्वामी दर्शनास मोठ्या भक्तिभावाने जात असतात. एवढेच नव्हे तर, मुंबई व ठाण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये स्वामी समर्थांचे अनेक मठ आढळतात. या मठांमध्ये फक्त गुरूपौर्णिमा व दत्त जयंती या महत्त्वाच्या धार्मिक तिथींनांच नव्हे तर दर गुरुवारी भक्तांची दर्शनासाठी स्वामींची कृपा लाभासाठी रीघ लागलेली असते. या भक्तगणांमध्ये उच्चविद्या-विभूषित लोकांचा व आपापल्या कलाक्षेत्रातील यशस्वी लोकांचा समावेश असतो. ही स्वामींनी समाजातील सर्व स्तरांपर्यंत अध्यात्माची गोडी नेऊन पोहोचवली आहे याची प्रचिती आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. स्वामी भक्तांमध्ये आजच्या क्षणी सुद्धा ते आपल्यातच वावरत आहेत अशी भावना असते. अनेक भक्तगण असे बोलताना आढळतात की, स्वामींच्या तसबिरीकडे पाहिल्यावर असा अनुभव येतो की, ते आपल्या तीक्ष्ण नजरेने आपल्याकडे पाहत आहेत व आपल्या नजरेतूनच आपल्या लेकरांना 'भिऊ नकोस, मी तुझ्या सोबत आहे' असा संदेश देत आहेत. यातूनच भक्तांना ऊर्जा मिळते व त्यांच्यात सकारात्मकता निर्माण होऊन आलेल्या कठीण प्रसंगांना तोंड देण्याचे, नव्हे त्यांना पळवून लावण्याचे पाठबळ मिळते. यामागचे कारण म्हणजे स्वामींनी आपल्या भक्तांना सांगितले होते की, ते सदैव त्यांच्यासोबत आहेत. खुद्द त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर स्वामी म्हणाले होते, 'हम गया नहीं जिंदा हैं'.

स्वामी समर्थांचा स्वभाव कडक असला तरी भक्तांना त्यांच्याविषयी लळा होता व स्वामी सुद्धा त्यांना लेकरांसारखे वागवत असत. स्वामींचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते शिवा-शिव, सोवळे ओवळे पाळत नसत. ते आपल्या सर्व भक्तांना समान वागणूक देत असत. स्वामींनी फक्त सामान्य भक्तगणांनांच मार्गदर्शन केले नाही तर, त्यांचे मार्गदर्शन शिर्डीचे साईबाबा व

---

त्या शिक्षणाचा काय उपयोग जे शिकुनही कचरा रस्त्यावर टाकतात,
अन तोच कचरा रोज सकाळी न शिकलेली माणस उचलतात.

शेगावचे गजानन महाराज यांच्यासारख्या विभूतींनां देखील लाभले असे संदर्भ आढळतात. स्वामी समर्थांवर त्यांच्या भक्तमंडळींपैकी बऱ्याच जणांनी मोठ्या प्रमाणात लिखाण करून ठेवलेले असल्यामुळे आपणास स्वामींच्या जीवनाशी व कार्याशी संबंधित बरीचशी माहिती उपलब्ध होते. प्रा. डॉ. यशवंतराव पाटील यांनी आपल्या 'स्वामींची दिव्यानुभूती' या पुस्तकात असे म्हटले आहे की, कै. गोपाळबुवा केळकर यांनी स्वामींच्या हयातीतच त्यांची बखर लिहिली. ही बखर मोडी लिपीत लिहिलेली आढळते. केळकरांना समर्थकृपा झाल्यामुळे ते स्वामी भक्त झाले व त्यांनी एकप्रकारे महाराजांविषयी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना बखररूपी आदरांजली दिली असावी असे म्हणणे वावगे ठरू नये. या गोपाळबुवांना पोटदुखीचा भयानक त्रास होता व त्यातून स्वामी कृपेमुळे त्यांची सुटका झाली होती. केळकरां-व्यतिरिक्त आनंद महाराज, वामनराव रावजी वैद्य, गणेश बल्लाळ मुळेकर, श्री. शं. खानवेलकर, सखाराम बाळकृष्ण सरनाईक, नारायण हरी भागवत, माधवाचार्य रामचंद्र मैसलगीकर आदी लोकांनी स्वामी समर्थांवर लिहिल्याचे निदर्शनास येते. मैसलगीकरांनी लिहिलेले स्वामींचे चरित्र संस्कृत भाषेत आहे.

स्वामींना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती की, एकोणीसाव्या शतकात हिंदू धर्माचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एकतर, धर्मात जातीव्यवस्थेवरील आधारित विषमता, अनाठायी रूढी व परंपरेचा विळखा, अंधश्रद्धेचे स्तोम तर दुसरीकडे भारतीयांनी जोपासलेली गुलामगिरीची भावना यात धर्म गुरफटून गेलेला होता. स्वामींना हे चित्र बदलायचे होते त्यामुळे त्यांनी आपल्या भक्तांना पादुका दिल्या व विविध भागांमध्ये खरा धर्म प्रसार करण्यासाठी भटांची स्थापना करण्यास सांगितले. ते अशा मठांनां 'किल्ले' म्हणत असत.

स्वामी समर्थांच्या वरील वचनांची आठवण त्यांच्या भक्तांना सदैव असते. याचे कारण ते जेव्हा स्वामींच्या तसबिरीकडे पाहतात त्या प्रत्येक वेळी त्यांना समर्थ आपल्या सोबत आहेत अशी भावना निर्माण होते. अशा या अलौकिक दैवीपुरुषाची अवतार समाप्ती १८७८ साली म्हणजेच शके १८०० बहुधान्यानाम संवत्सरे चैत्र वैद्य १३ मंगळवारी तिसरे प्रहरी चार वाजता झाली. महाराजांना त्यांची अवतार समाप्ती होणार याची अनुभूती साधारणपणे एक वर्षभर अगोदर आली होती असे भक्तगण म्हणतात. बाळाप्पा व चोळप्पा हे स्वामींचे निस्सीम भक्त होते. यापैकी चोळाप्पाने महाराजांची समाधी अगोदरच बांधलेली होती तेथे स्वामींचा दिव्य देह ठेवण्यात आला. स्वामी आपल्यातून निघून गेलेले पाहून अनेक भक्तांनी टाहो फोडला. काहीजण तर प्राणत्याग करण्यास देखील सज्ज झाले. यावरून स्वामींचे त्यांच्या भक्तांसोबत असलेले नाते अधोरेखित होते. आजही अक्कलकोटला वा स्वामींच्या कुठल्याही मठात गेल्यानंतर त्यांच्या दिव्यत्वाची प्रचिती येते. तसेच त्यांचे 'हम गया नहीं जिंदा हैं' हे शब्द तंतोतंत खरे असल्याची अनुभूती येते. एवढेच नव्हे तर, स्वामी सदैव आपणास 'भिऊ नकोस मी तुझ्या सोबत आहे' असे ठणकावून सांगून जीवनरूपी महासागर पार करण्यासाठी आपल्या मागे खंबीरपणे उभे आहेत असे जाणवते. अशा या दत्तावतारी श्री अक्कलकोटनिवासी स्वामी महाराजांची म्हणजेच स्वामी समर्थांची कृपा सर्व चराचरांवर राहो ही त्यांच्या चरणी प्रार्थना.

श्री स्वामी समर्थ, जय स्वामी समर्थ!

**संदर्भ ग्रंथ:**


- अक्कलकोट श्रीस्वामी समर्थ महाराजांची आद्य बखर - विवेक दिगंबर वैद्य (संशोधन व संपादन)


(पृष्ठ क्र. १० वर)

# सर्वस्पर्शी कालिदास

*आषाढ महिन्यातील पहिला दिवस या वर्षी ३० जून रोजी आहे. 'महाकवी कालिदास दिन' म्हणून हा दिवस साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने महाकवी कालिदासाच्या लेखनावर प्रकाश टाकणारा डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांचा लेख – संपादक*

गोव्याचे प्रसिद्ध कवी शंकर रामाणी यांच्या जन्मशताब्दी वर्षाला २६ जून रोजी सुरुवात झाली. 'दर्पणीचे दीप', 'निळे निळे ब्रह्म', 'कातरवेळ', 'आभाळवाटा', 'गर्भागार' इत्यादी कविता-संग्रहातून त्यांची कविता बहरली.

*वणवण फिरणारे कोण दारात आले*
*गहण नभ मनाचे पूर्ण आषाढलेले*

अशा अत्यंत सुंदर ओळींमधून आषाढ महिन्यातील कातर अवस्था ते व्यक्त करतात. आषाढ अजून एका कवीसाठी प्रसिद्ध आहे.

कालिदासाच्या 'मेघदूत' या खंडकाव्यात 'आषाढस्य प्रथम दिवसे' असा उल्लेख येतो. या उल्लेखा मुळेच आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रख्यात भारतीय कवी कालिदास याचा जन्मदिवस जगभर साजरा केला जातो. याला 'महाकवी कालिदास दिन' असेही म्हणतात. आपल्या साहित्यकृतीतील एका उल्लेखामुळे कवीचा जन्मदिवस साजरा होणारी कदाचित ही एकमेवाद्वितीय गोष्ट असेल.

विरहकातर झालेल्या कोणा यक्षाने आषाढाच्या पहिल्या दिवशी आकाशात गर्दी करणाऱ्या मेघांना उद्देशून लिहिलेलं हे अजरामर काव्य. कालिदासाचा काळ नेमका कोणता यावर विद्वानांमध्ये मतभेद आहेत. मात्र त्याच्या प्रसिद्ध कलाकृती मध्ये आषाढ महिन्याचे एवढे नेत्रसुखद वर्णन आले आहे की, हा संपूर्ण महिना कालिदासाच्या मेघदूतातील मंदाक्रांता वृत्तातील सुंदर श्लोकांनी व्यापून गेलेला असतो.

'कविताकामिनीचा विलास', 'कविकुलगुरू', 'महाकवी' अशा वेगवेगळ्या नावांनी कालिदासाला ओळखले जाते. कालिदास म्हटलं की आपल्यासमोर उभी राहते ती शकुंतला, मेघदूतातील विरहकातर यक्ष, रघुवंश महाकाव्यातील नंदिनीची सेवा करणारे राजा दिलीप व सुदक्षिणा आणि अशी अनेक पात्रं. ज्येष्ठ इंग्रजी लेखक विल्यम जोन्सने कालिदासाला 'भारताचा शेक्सपियर' असं संबोधलं होतं. यामध्ये दोन्ही साहित्यिकांची जीवनविषयक दृष्टी अधोरेखीत होतो. कालिदास एक मोठा कवी होऊन गेला एवढा एकच विचार प्रत्येक भारतीयाला माहिती असतो; मात्र या साहित्यिकाच्या लेखनाचा पैस मोठा होता; त्यांना उभं केलेलं मानवी भावविश्व अगाध होतं हे अभ्यासांती समजतं.

अंत:पुरातील गुजगोष्टींपासून हिमालयाच्या उत्तुंग शिखरापर्यंत कालिदासाची लेखणी लीलया संचार करते. भोग व त्याग, शृंगार व वैराग्य, काम व मोक्ष यांचा सुरेख समन्वय कालिदास साधतो. डॉ. के. ना. वाटवे यांनी म्हटल्याप्रमाणं वाल्मिकीच्या नीतीला आणि व्यासांच्या बुद्धीला कालिदासाने सौंदर्याची जोड दिली. व्यासांनी सत्य, वाल्मिकीने शिव, तर कालिदासाने सौंदर्य यांची प्रचिती प्रामुख्याने दिली. व्यास, वाल्मिकी आणि कालिदास यांच्यात भारतीय संस्कृतीचे सार साठवलेले आहे, असे महर्षी अरविंद म्हणतात ते याचमुळे.

---

ज्यांच्याकडून काही आशा नाही, बहुतेकदा तेच लोक चमत्कार करतात!

कालिदासाने रघुवंश व कुमारसंभव ही दोन महाकाव्ये लिहिली. या काव्यात उपमा, उत्प्रेक्षा वगैरे अलंकारांची रेलचेल आहे. कथेच्या दृष्टीने महाकाव्याला साजेसा अत्यंत मोठा पट कालिदास आपणासमोर उभा करतो. त्यातील सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक व मानसशास्त्रीय संदर्भ आज देखील समयोचित वाटतात. तत्कालीन समाजाचं आकलन करण्यासाठी ही महाकाव्ये म्हणजे महत्त्वाचे साधन ग्रंथ आहेत. प्रसन्न भाषा, अलौकिक प्रतिभाविष्कार आणि अभिजात कल्पनाविलास या गुणांमुळे ही महाकाव्ये अजरामर झाली.

'ऋतुसंहार' ही कालिदासाची पहिली रचना असे समजले जाते. इथे 'संहार' या शब्दाचा अर्थ एकत्र करणे, बांधणे गुंफणे अशा अर्थाने योजला आहे. ऋतुसंहार म्हणजे ऋतूंची शोभायात्रा. सहा ऋतूंचे सहा सोहळे पाहून रसिकांचे भान हरपून जाते. ऋतुसंहार या काव्यात ग्रीष्मादी ऋतूंच्या प्रभावामुळे चराचरात होणारे बदल आपल्या सौंदर्य शोधक नजरेने टिपून या काव्यात अक्षरबद्ध केले आहेत. कालिदासाच्या संवेदनक्षम प्रतिभेचा हा सुरुवातीचा अविष्कार. या काव्यातून कवीची सौंदर्यदृष्टी प्रतीत होते.

मेघदूत या खंडकाव्यात हिमालयाच्या कुशीत अलका नगरीत राहणाऱ्या एका यक्षाची कथा आहे. पत्नी वियोगाचा शाप मिळाल्यामुळे दूरवर दक्षिणेत रामगिरी पर्वतावर तो वास्तव्य करतो. आषाढाच्या पहिल्याच दिवशी पर्वतावर धडका देणाऱ्या काळ्याकभिन्न मेघांना पाहून त्याची विरहवेदना दाटून येते. मेघाला दूत समजून आपल्या प्रियाला दिलेला संदेश मेघदूत या काव्यात येतो. कालिदासाची सौंदर्यदृष्टी मंदाक्रांता वृत्तातील प्रत्येक श्लोकांमध्ये आपल्याला पाहायला मिळते.

विशेष करून मराठी साहित्यिकांनी तर मेघदूतावर जीवापाड प्रेम केलं आहे. या काव्याचे जवळपास २८ अनुवाद मराठीत झाले असून यामध्ये कृष्णशास्त्री चिपळूणकर, चिं. द्वा. देशमुख, रा. ची. श्रीखंडे, ना. ग. गोरे, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, वसंत बापट व शांता शेळके यांचाही समावेश आहे.

वानगीदाखल शांता शेळके विरह वेदनेने त्रस्त झालेल्या यक्षपत्नीची भावनिक आंदोलनं खालील श्लोकात मांडतात :

*उंबरठ्यावर फुले मांडुनी एक एक ती दिवस मोजिते*
*किती विरहाचे मास राहिले पुन्हा पुन्हा अजमावुनी बघते*
*रमते तेव्हा कल्पनेत मम सहवासाची चित्रे रेखून*
*विरहा मध्ये रमणी बहुधा असेच करिती मनोविनोदन।*

कालिदासाच्या मेघदूताने हिंदी साहित्य विश्वावर देखील मोहिनी घातली आहे. ज्येष्ठ हिंदी नाटककार मोहन राकेश यांचं 'आषाढ का एक दिन' हे एक महत्त्वाचं नाटक आहे. कालिदासाच्या जीवनातील आणि साहित्यातील काही घटनांचा उपयोग करून लिहिलेलं हे एका व्यापक जीवन विषयक समस्येला भिडणारे नाटक.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी देखील कालिदासाचा मोठा व्यासंग केला होता. मेघदूतावर त्यांचं विशेष प्रेम होतं.

ते लिहितात की, 'आज मी पूर्वेकडच्या श्यामल वंग देशात बसून मेघदूत वाचतोय. पावसाच्या धारा बरसत आहेत, विजा चमकत आहेत. अशावेळी घराचे दार बंद करून मी एकटाच बसलोय. हे कवी, तुझ्या मंत्रानं माझ्या हृदयात कोंडलेली व्यथा मोकळी झाली. मला अनंत सौंदर्यात चिररात्री एकाकी जागून विरह वेदना सोसणाऱ्या विरहिणी प्रियेचा विरहरूपी स्वर्गलोक मिळाला'.

कालिदास जसा कवी होता तसाच एक क्रांतदर्शी नाटककार देखील होता. त्याने तीन नाटकं लिहिली.

---

'मालविकाग्निमित्र' या पाच अंकी नाटकात राजा अग्निमित्र आणि मालविका या राजकन्ये सोबत झालेल्या प्रणय कथेला नाट्यरूप दिले आहे. 'विक्रमोर्वशीयम' या नाटकात वेद वाङ्मयात आणि पुराणांमध्ये प्रसिद्ध असलेल्या पुरूरवा आणि उर्वशी यांच्या प्रेमकथेचं दर्शन आपल्याला होतं. कालिदासाचं सर्वात प्रसिद्ध नाटक म्हणजे 'अभिज्ञान शाकुंतल'. 'काव्येषु नाटकं रम्यम् तत्र रम्या शकुंतला' असं एका कवीने म्हटले आहे. अर्थात सर्व नाटकात श्रेष्ठ असं हे 'शाकुंतल' नाटक म्हणजे संस्कृत नाट्यसृष्टीचं अमोल लेणं आहे. जर्मन कवी गोएथे शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला असे म्हटले जाते. कालिदासाच्या प्रतिभावेलीवरचं सर्वात टवटवीत, सुगंधानं भरलेलं पुष्प म्हणून या नाटकाचा उल्लेख केला जातो. अभ्यासकांच्या मते शेक्सपियरच्या 'द टेम्पेस्ट' या नाटकाची कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतल' नाटकाशी तुलना होऊ शकते. विशेष म्हणजे या दोनही नाटकांतील नायिका शकुंतला व मिरांडा यांच्या मध्ये साम्यस्थळं आढळतात.

वसंत बापट यांनी म्हटलं आहे, संस्कृत वाङ्मयाचा महासागरात चित्रमय पोळ्यांची बेटे आहेत, अलौकिक रत्न गुंफा आहेत त्या कालिदासाच्या कलाकलापाच्या. बघणाऱ्या, बघशील किती, असे हे रंगाचे वैभव आहे. कितीतरी शतके कालिदासाची कविता मानवी मनाला निर्विकल्प समाधीचा आनंद देत आहे.

वाणीला परतत्त्वाचा स्पर्श झाल्यावर जे साहित्य निर्माण होतं ते अक्षर वाङ्मय होय. भारतीय उपखंडाचे समग्र सांस्कृतिक संचित आपल्या लेखणीतून दृग्गोचर करणारा महाकवी कालिदास जगण्याकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टी आपल्याला देतो. विद्वत्ता व सौंदर्यानुभूती, कवित्व आणि रसिकत्व यांचा सुंदर मिलाफ म्हणजे कालिदासाचं साहित्य. चराचरामध्ये परमतत्त्वाचा साक्षात्कार करून देणारी कालिदासाची चैतन्यानुभूती पुढच्या पिढ्यांना नेहमीच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत राहील. आजच्या दिवशी या महाकवीला कृतज्ञ वंदन.

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

•••

---

(पृष्ठ क्र. ७ वरून - **भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ! भाग – २**)

- दारिद्र्य, दु:ख, संकटनाशक श्रीदत्त उपासना – प्रिया मालवणकर
- कर्दळीवन एक अनुभूती – प्रा. क्षितिज पाटुकले
- श्रीदत्त परिक्रमा – प्रा. क्षितिज पाटुकले
- श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत – मूळ ग्रंथरचना – श्री शंकर भट– अनुवाद– श्री हरिभाऊ जोशी निटूरकर
- श्री अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ चरित्र व कार्य – श्रीपादशास्त्री किंजवडेकर
- स्वामींची दिव्यानुभूती – प्रा. डॉ. यशवंतराव पाटील

**– सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर महाविद्यालय (स्वायत्त),
ठाणे (पश्चिम)– ४००६०६
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

•••

# शेअर बाजाराविषयी काहीतरी...

*शेअर बाजाराच्या सद्यपरिस्थितीची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

शीर्षकातला दुसरा शब्द ''काहीतरी'', आहे... काहीतरीच नाही !

हे सुरवातीलाच लिहिण्याचे कारण म्हणजे गेल्या दीड - दोन महिन्यांत आपल्या देशाच्या शेअरबाजाराच्या निर्देशांकात झालेली प्रचंड घसरण !

एरवी नेहमी म्हटले जाते की, ''महापुरे झाडे जाती तिथे लव्हाळी वाचती''. पण या महापुरात लव्हाळीही वाचलेली नाहीत अशी स्थिती आहे.

अशा परिस्थितीत तुमच्या-माझ्या सारख्या लहान व सर्वसामान्य गुंतवणूकदारांनी नेमके काय करावे हा प्रश्नच आहे.

कारण हा लेख लिहीत असताना मे महिन्याच्या सुरवातीला ५७००० अंशांच्या पातळीवर असणारा मुंबई शेअरबाजाराचा निर्देशांक ५४००० अंशांच्या पातळीवर उतरला आहे. या दीड - दोन महिन्यांच्या काळात एक वेळ तर अशी आली होती की, तो ५२५०० च्या पातळीवरही उतरला होता.

एका पाहणीनुसार हा लेख लिहीत असताना आपल्या देशातील सर्वोच्च अशा ५०० शेअर्स पैकी ८५-८६ टक्के शेअर्समधे त्यांच्या २०० दिवसीय बदलत्या सरासरीच्या (Moving - verages) पातळी पेक्षाही खालच्या भाव - पातळीवर खरेदी - विक्रीचे व्यवहार सध्या होत आहेत. अशा पतमान पद्धतीचा विचार करून दीर्घकालीन भवितव्याचा अंदाज बांधणाऱ्याच्या मते असे होणे हा दीर्घकालीन आणि तीव्र स्वरूपाच्या मंदीचा संकेत असतो.

असे जर खरे झाले तर केवळ ''शुभ बोल रे नारायणा'' अशातली गत !

त्यामुळे शेअरबाजार खाली खाली येत आहे म्हणून एलआयसीच्या शेअर्सचा बाजारभाव खाली येत आहे, की एलआयसी सारख्या शेअर्सचेही भाव उतरत आहेत म्हणून शेअरबाजार खाली येत आहे अशा प्रश्नाचे उत्तर शोधणे म्हणजे आधी अंडे की आधी कोंबडे सारखी गत झाली आहे !

काहीही असले तरी एक गोष्ट नक्की की ही परिस्थिती एक - दिशीय आणि एक - मितीय नाही.

एकीकडे कोरोना, अफगाणिस्तान - तालिबान, रशिया - युक्रेन सारखे प्रश्न सुटलेले नसूनही त्यांची छाया - पडछाया सोयीस्कर असेल तेंव्हा जागतिक शेअरबाजार अधूनमधून ओढतो आहे. त्यात सोय किती आणि सत्य किती यांच्या बदलत्या तीव्रतेवर शेअरबाजारातले चढ - उतार घडत आहेत.

याची सगळ्यात ठळक झलक म्हणजे आपल्या देशाच्या शेअरबाजारात असणारा किंवा नसणारा विदेशी गुंतवणूकदारांचा सहभाग हा घटक गेल्या ९ महिन्यांत सुमारे ३० दशलक्ष डॉलर्स इतक्या अवाढव्य रकमेच्या शेअर्सची विक्री विदेशी वित्तसंस्थानी केल्यामुळे आणि यांपैकी फार मोठ्या प्रमाणात गेल्या काही आठवड्यात केल्यामुळे सध्या आपल्या शेअरबाजारात घसरणीचे महाभारत सुरू आहे असे सांगितले जात आहे. ते काही प्रमाणात खरेही आहे.

---

रागाला जिंकण्याचा एकमेव उपाय म्हणजे मौन.

कारण अशावेळी लक्षात घेतलाच पाहिजे असा घटक म्हणजे कोरोनाच्या पहिल्या लाटेत चीनबाबत अनेक देशांनी स्वीकारलेल्या नकारात्मक धोरणाचा लाभार्थी मोठ्या प्रमाणावर आपला देश होता. त्यातच जगातील इतर अनेक देशांच्या तुलनेत कोरोनाजन्य परिस्थिती...आर्थिक + सामाजिक + राजकीय अंगाने... हाताळण्यात आपली परिस्थिती उजवी होती. परिणामी विदेशी गुंतवणुकीच्या ओघाचे आणि प्रवाहाचे एक (एकमेव नाही) महत्त्वाचे गंतव्यस्थान (फायनल डेस्टिनेशन) आपला देश बनला होता. त्यातूनच स्वातंत्र्योत्तर काळाच्या आर्थिक इतिहासातील परकीय चलनाच्या गंगाजळीची (फॉरेक्स रिझर्व्हज) विक्रमी पातळी गाठली गेली. त्यांतून रुपया आणि जागतिक पातळीवर व्यवहारांसाठी महत्त्वाची ठरणारी इतर देशांची चलने, विशेषतः अमेरिकी डॉलर्स, यांचे विनिमयाचे दर आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला काहीसेतरी अनुकुल पातळीवर आले. अशा अनेक घटकांच्या एकत्रित परिणामातून आपल्या देशाच्या शेअरबाजाराच्या निर्देशांकानी उसळी घेतली. त्यातच २०२१ सालात आपल्या देशाच्या राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाच्या विकास दराने आधीच्या वर्षांच्या तुलनेत सकारात्मक प्रगती दाखवल्याने (जी जगभरातल्या बहुतांश देशांना साध्य झाली नाही) ही प्रक्रिया जास्तच वेगवान झाली.

परिणामी कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत जागतिक गुंतवणूक क्षेत्रात सोने आणि भारतीय शेअरबाजाराचे निर्देशांक यांच्यात तेजीच्या वेगाबाबत स्पर्धा होत होती.

आता या चित्रात जागतिक राजकारणातील काही घटकांसह वेगळा परिणाम होताना दिसतो आहे. एकतर २०२०-२०२१च्या तुलनेत सध्या कोरोना बाबत परिस्थिती सुधारलेली आहे. सर्वसामान्य माणसे आणि अर्थव्यवस्था त्याच्याकडे ''रोज मरे, त्याला कोण रडे'' पद्धतीने बघायला शिकली आहेत तर सर्वपक्षीय राजकीय नेते कोरोना म्हणजे संभावित, सोयीस्कर खरचटणे म्हणून उपयोगात आणत आहेत. निदान आता त्याच्या तीव्रतेचा बराचसा अंदाज बांधण्यात आपण सगळेच सराईत झालो आहोत. कोरोना येताना आजार म्हणून आला असला तरी तो आता बाजार झाला आहे. त्यांचे हे आर्थिक रूप जाणवायला लागल्यावर बाजार उठवण्याची त्याची क्षमता हे खेळणे बनले आहे. कदाचित, त्यासाठी त्यावेळी सगळ्याच देशांनी घेतलेल्या विविध, वेळप्रसंगी परस्पर - विरोधी ही, निर्णयांचे भले - बुरे परिणामही आता निव्वळ चर्चेची बाब न उरता वस्तुस्थिती बनली आहे. त्यामुळे अशा गोष्टी शेअरबाजाराने त्याच्या खास "Discounting the Present as well as Future" अशा वृत्तिनुसार गृहीत धरायला सुरवात झाली आहे. तसेच कोणत्याही गोष्टीवर ताबडतोब आणि तीही टोकाची प्रतिक्रिया देण्याची शेअरबाजाराची अंगभूत लकब आहेच... तेंव्हा तेजीने टोक गाठत अस्वली गुदगुल्या केल्या; आता घसरणीने प्राण कंठाशी आणले आहेत.

अर्थांत हे अपेक्षित होतेच... प्रमाण आणि सातत्य जरी नसले तरी दिशा नक्कीच अभिप्रेत होती आणि आहे.

कारण कोणत्याही देशात, कोणत्याही काळात झालेली कोणतीही विदेशी गुंतवणूक ही अशी गुंतवणूक होत असलेल्या देशाची अर्थव्यवस्था चालवण्यासाठी होत नसते. अशी गुंतवणूक ही नेहमीच तत्कालीन प्राप्त परिस्थितीत कमीत कमी धोकादायक आणि जास्तीत जास्त फायदेशीर संधी म्हणून आणि म्हणूनच होत असते. त्यामुळे अपेक्षित नफा झाला किंवा होत आहे म्हणून प्रॉफिट बुकिंग तत्त्वावर विक्री होत असते.

त्याशिवाय अनेकदा आधी गुंतवलेल्या संधीपेक्षा जास्त आशादायी किंवा धनदायी संधी मिळाली तर आधीची गुंतवणूक, संधी नुसार एकरकमी किंवा मोठ्या प्रमाणावर किंवा टप्प्या - टप्प्याने काढून घेत राहण्याचा विदेशी गुंतवणुकीचा सार्वकालिक शिरस्ता आहे. त्यातच

---

कच्च्या मालाच्या उत्पादक देशांत कच्च्या मालाच्या उपभोक्ती देशांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याची पद्धत गेल्या ५-६ महिन्यांत बळावत आहे.

या सगळ्याच घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे सध्या सुरू असलेला विदेशी गुंतवणूक संस्थांच्या विक्रीचा सुरू असलेला सपाटा !

या घटकाचा एक पैलू उदाहरण म्हणून पाहायचा झाला तर कोरोनाच्या पहिल्या भरात पैशांची ऑनलाइन ट्रान्सफर हा अपवाद वगळला तर बाकी अनेक हालचालींवर या ना त्या स्वरूपात तीव्र ते अल्प स्वरूपाची बंधने निश्चित होती. त्यामुळे एक अपरिहार्यता म्हणूनही अनेक देशांना धोरणात्मक दृष्ट्या Looking Inward असा पवित्रा घ्यावाच लागला. आपल्या देशाने आत्मनिर्भर हे धोरण जसे स्वीकारले तसे ! असे करणारा जगभरात काही आपला एकमेव देश नव्हता. त्यात स्थळ - काळानुसार क्षेत्रनिहाय बदल किंवा फरक नक्कीच होता. आणि नंतरही वेळोवेळी त्यात बदल होत गेले.

तसेच त्याच्या अंमलबजावणीत काळ - सातत्य -तीव्रता यांत देशपरत्वे नक्कीच फरक पडला असेल. तसेही कोणत्याही देशाचे, कोणत्याही काळातील, कोणतेही आर्थिक धोरण हे कधीच फक्त आणि फक्त आर्थिक घटकांवर आधारित नसते. अवलंबून तर नसतेच नसते. त्यात सामाजिक आणि राजकीय (स्थानिक ते जागतिक अशा सर्व पातळींवरचे) घटक अंतर्भूत असतातच. आणि त्यांची ढवळाढवळ किंवा हस्तक्षेप आहे असे म्हणताही येऊ नये इतका त्यांचा त्या त्या धोरणावर प्रभाव असतो... अगदी एखाद्या सरकारचे अस्तित्व बाहेरून पाठिंबा देणाऱ्या पक्षावर अवलंबून असावे असे किंवा एखादे सरकार कोणीतरी रिमोट कंट्रोलने चालवावे तसे !

अशावेळी सरकार स्थापन होताना जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमा सारखी त्या त्या आर्थिक धोरणाची अवस्था असते. तो कार्यक्रम किती काळ, किती गांभीर्याने, सर्वार्थाने (In letters as well as in its spirit ) अंमलात आणला जातो यांवर त्याचे यशापयश आणि भवितव्य अवलंबून असते...

जेंव्हा त्याचे सकारात्मक परिणाम एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेत दिसायला लागतात आणि त्याचा विपरीत परिणाम काही हितसंबंधीत अर्थव्यवस्थांवर दिसायला लागतात तेंव्हा साहजिकच सकारात्मक अर्थव्यवस्थेतून विदेशी गुंतवणूक काढायला सुरवात होते. यांत जेवढा धोरणात्मक दबावाचा (प्रसंगी धाक - दपटशाचा सुद्धा) भाग असतो तेवढाच तो चलनाच्या विनिमय - दराचाही असतो... सध्या हे कधी तेलाच्या भावात लक्षात येते तर कधी डॉलरच्या विनिमय दरात आणि परिणामी महागाईच्या दरात !

सध्याच्या वातावरणात विदेशी संस्थांच्या विक्रीमागे एखाद आंतरराष्ट्रीय राजकारणाचा दबावगट नसेल ना याचाही विचार करावाच लागेल.

अमेरिका आणि काही युरोपीय देशांचा आपल्या देशाला आग्रह होता की, रशिया - युक्रेन मधील अद्याप न संपलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आपण देश म्हणून रशियाकडून तेल विकत घेऊ नये. पण या आग्रहाला किंवा दबावाला फारशी किंमत न देता आपण त्याबाबत रशियाशी तेल खरेदीचा करार केला. तोही दीर्घकालीन! आपल्या देशाचे तेलाच्या आयातीवर अवलंबून असण्याचे प्रमाण आणि खरेदीचे प्रचंड प्रमाण इथे विसरता येत नाही. रशिया असा तेल - पुरवठा सवलतीच्या दराने तर करणार आहेच. शिवाय या आयातीचे पैसे डॉलर्समधे मोजावे लागणार नाहीयेत. यात जागतिक अर्थकारणाच्या निकषांवर बहुआयामी परिणाम होत आहेत आणि होणार आहेत.

असे फक्त केवळ तेलाबाबत होत आहे असेही नाही. संरक्षण, धातू क्षेत्र त्याच मालेत आहेत. इतकेच

नव्हे, हे कमी आहे म्हणून की काय, जागतिक व्यासपीठावर आपले विदेशमंत्री माननीय श्री. जयशंकर आपली ही भूमिका ठणकावून ठणकावून मांडत आहेत.

Performance आणि Perceptipn या दोन्ही दृष्टीने हे जागतिक वस्तू - बाजारावर (तेलाच्या किंमतीसह) व्यापक परिणाम करणारे आहे.

त्याबाबत एक दबावगट म्हणून तर विदेशी वित्तसंस्था सध्या विक्रीच्या पवित्र्यात नाहीत ना?

पण आपल्या देशासारख्या मोठ्या बाजारपेठेत हे कधीच दीर्घकाळ सुरू राहात नाही. त्यातही जेंव्हा त्याची सुरवात विक्रमी परकीय चलनाच्या साठ्यात होते आणि कितीही विक्री झाली तरी असा साठा पूर्णपणे बाहेर गेलेला नसतो तेंव्हा तर नाहीच नाही. त्यातही विदेशी गुंतवणूक संस्था एकीकडे मोठ्या प्रमाणावर विक्री करत असतानाही विक्रीच्या तुलनेत कमी (अत्यल्प किंवा नगण्य नाही) प्रमाणात का होईना पण नवीन गुंतवणूक करत असतात तेंव्हा तर अशी घसरण दीर्घकालीन नसतेच नसते असाच आजपर्यंतचा इतिहास आहे.

याबाबत लक्षात घेण्याजोगा अजून एक मुद्दा म्हणजे जगातल्या अनेक अर्थव्यवस्था व्याजदरात करत असलेली वाढ. अमेरिकेत एका टप्प्यात झालेली विक्रमी दरवाढ आणि त्याच सुमारास आपल्या देशातही रिझर्व्ह बँकेने लागोपाठ दोनदा केलेली दरवाढ. त्याचाही एक नकारात्मक परिणाम सध्याच्या शेअरबाजारातल्या घसरणीला कारणीभूत आहेच. पण याकडे जरा काळजीपूर्वक बघितले पाहिजे. कारण शेअरबाजाराला व्याजदराचे सोहेर - सूतक नेहमीच सोयीस्करपणे असते. नात्याच्या जवळकीनुसार सोहेर - सूतकाचा काळ जसा बदलतो तशीच गत व्याजदराबाबत शेअरबाजाराची असते. त्यातही जसे काहीवेळा रक्ताच्या नात्यापेक्षा भावनिक नाते जास्त धक्का देऊन जाते तसेही घटक यात असतातच.

तसेही कोरोनाजन्य परिस्थितीत जगातल्या इतर अनेक देशांनी त्यांच्या त्यांच्या अर्थव्यवस्थेत ज्या प्रमाणात व्याजदर कमी केले होते, तेवढे आणि त्या प्रमाणात आपल्या देशात व्याजदर तेंव्हा कमी झालेले नव्हते. त्यामुळे आपल्या देशात व्याजदर किती वाढतील याला एक अंतर्भूत अशी मर्यादा आहे.

कितपत विश्वास ठेवायचा हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरी याआधी काहीवेळा असेही झाले आहे की, अमेरिकी मध्यवर्ती बँकेने प्रत्यक्षात व्याजदरात वाढ केली (नुसती चर्चा नव्हे) की त्यानंतर जगातल्या अनेक देशांचे शेअरबाजार उसळी घेतात. आणि अशी उसळी किंवा वाढ आधीच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या घसरणीपेक्षा आकडेवारीच्या तुलनेत जास्त असते आणि तिचा तेजीच्या स्वरूपातला प्रभाव जास्त काळ टिकतो.

व्याजदर - तेलाचे दर - परकीय चलनाचे विनिमय दर - महागाईचा दर - आर्थिक विकासाचा दर हे घटक एकमेकांशी निगडित आहेत. आणि हे सगळेच घटक निव्वळ आर्थिक कधीच नसतात. त्यामुळे या कारणांच्या पार्श्वभूमीवर शेअरबाजारात किंवा एकंदरीतच गुंतवणूक क्षेत्रात घडामोडी घडत असतील तर त्याही कधीच निव्वळ आर्थिक स्वरूपाच्या नसतात हे विसरून चालणार नाही. साहजिकच त्याची उत्तरेही अनेक कंगोरे असणारी असणार. निदान असावी लागतील.

त्यामुळे आत्ता आपला शेअरबाजार हा ''खेळ संयमाचा'' असा आहे. आततायी निर्णयांना थारा देणारा निश्चित नाही.

**- चन्द्रशेखर टिळक**

सी-४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

प्रामाणिकपणा ही खूपच बहुमुल्य वस्तू आहे, कुठल्याही फालतू माणसाकडून त्याची अपेक्षा धरू नका.

# शिवराज्याभिषेकाचा आनंद सोहळा

*आपण नुकताच शिवराज्याभिषेकाचा आनंद सोहळा साजरा केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक रायगडावर जेव्हा झाला तेव्हा ईस्ट इंडिया कंपनीचा प्रतिनिधी तेथे उपस्थित होता. त्याने लिहिलेल्या राज्याभिषेक सोहळ्याचा वृत्तांत यावर प्रकाश टाकणारा लंडन येथील संकेत कुलकर्णी यांचा लेख खास दिशाच्या वाचकांसाठी – संपादक*

६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवराज्याभिषेकाचा आनंद सोहळा झाला.



'ईस्ट इंडीया कंपनी'चा प्रतिनिधी म्हणून हेन्री ऑक्झिंडेन हा अधिकारी उपस्थित होता. रायगडाचे वर्णन, राज्याभिषेक सोहळ्यातील विधी, दरबारी मानपान आदी सर्व गोष्टींची इत्यंभूत माहिती त्याने आपल्या दैनंदिनीमध्ये लिहिली आहे. रायगडाच्या दुर्ग–स्थापत्याबाबत त्याच्या नोंदी बारकावे सांगणाऱ्या आहेत. राजसदरेवरील ध्वनी योजना ही त्याला आवडलेली विशेष बाब होय असंही त्याने लिहून ठेवलंय. कंपनीच्या इतर कागदपत्रांसोबतच हेन्रीची ही दैनंदिनी ब्रिटिश लायब्ररीत जपून ठेवलेली आहे. पुढच्या एका कागदावर त्याची सहीपण पहायला मिळाली. ज्या माणसाने प्रत्यक्ष महाराजांना पाहिले त्या माणसाच्या डायरीला आणि प्रत्यक्ष केलेल्या सहीला हात लावताना मनात ज्या भावना आल्या त्या शब्दांत सांगणे कठीण आहे.



हा हेन्री दिसत कसा असेल ह्याबद्दल मनात बरंच कुतूहल होतं. त्याचं एक रेखाचित्र उपलब्ध आहे; पण त्यात काही खास मजा नव्हती – कारण त्या काळच्या

(पृष्ठ क्र. १८ वर)

कारण सांगणारी लोक यशस्वी होत नाही, आणि यशस्वी होणारे लोक कारण सांगत नाही.

# 'निर्मल-वारी' अभियान

*आळंदी देहू ते पंढरपूर हजारो वारकरी पांडुरंगाच्या दर्शनाला वारीमध्ये जातात. या वारीमध्ये आकाराला आलेल्या निर्मल वारी अभियानावर प्रकाश टाकणारा लेख – संपादक*

जून महिना म्हणजे आळंदी देहू ते पंढरपूर अशी चालत यात्रा करणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धा अभिव्यक्तीचा महिना. पंढरपुरला जाणाऱ्या या वारीला जवळपास सातशे वर्षांची परंपरा आहे याची आपल्याला कल्पना असेलच.

परंतु गेली शेकडो वर्षे जसजशी या वारीत माणसांची गर्दी वाढू लागली तसतसे स्वच्छतेचा मुद्दा गंभीर होत गेला ही देखील बाजू होती. पाचशे-हजार उंबरठा असलेल्या गावात पालखी सोबत चालणाऱ्या लाखो लोकांच्या शौचविधीचा गंभीर प्रश्न शासन, सामाजिक स्तरावर न हाताळला गेल्याने त्या त्या गावात पालखी येऊन गेल्यानंतर महिनाभर दुर्गंधी, शाळा, कॉलेज, बाजारपेठ आदी दैनंदिन कामकाज बंद व गावात रोगराई पसरल्याचे चित्र असे. नेहमीप्रमाणे हिंदू धर्मावर खार खाऊन असलेल्या काही विघ्नसंतोषी मंडळींनी वारीवर बंदी घालावी यासाठी कायदेशीर प्रयत्न सुरू केले.

एखादी समस्या दिसली की त्यावरून शासन व इतर संस्थांवर टीका करणे हा आपल्याकडील सर्वात सोपा व लोकप्रिय मार्ग आहे. तसेच अमुक तमुक गोष्टी कशा झाल्या पाहिजेत, काय काय केले पाहिजे असे इतरांना नुसतेच सल्ले देणारी घरटी पाच माणसं आपल्या इकडे आढळतात. ते एक असोच.

तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्वच्छ भारत' संकल्प सोडल्यावर आपण या संकल्पात कुठल्या प्रकारे सहभाग देऊ शकतो असा खल राष्ट्रीय विचारसरणीच्या काही मंडळींमध्ये सुरू झाला. यातूनच मग आपला धर्म, आपली संस्कृती, आपली परंपरा व आपली ओळख असलेल्या या पंढरपूर वारीला शक्य तेवढं स्वच्छ करण्याचा विडा श्री प्रदीप रावत, शिवाजी महाराज मोरे, नरेंद्र वैश्यंपायन, संदीप जाधव, संतोष दाभाडे आदी मंडळींनी उचलला. या सामाजिक कार्यासाठी काही व्यक्तींनी स्वतःच्या खिशातून वीस लाख रुपये निधी म्हणून दिले. (त्या व्यक्तींच्या विनंतीमुळे नावांचा उल्लेख केला नाही) अर्थात लाखो लोक एकत्र येणाऱ्या या वारीसाठी काही लाख रुपये गोळा झाले म्हणजे सर्व समस्या सुटली असे निश्चित होणार नव्हते.




वारी बद्दल माहिती असलेल्या प्रत्येकाला कल्पना असेल की, तुकाराम महाराज व ज्ञानेश्वर महाराज या पालखी सोबत चालणारे हजारो वारकरी हौस म्हणून रस्त्यावर शौचाला बसत नाहीत. नजर जाईल तिकडे माणसेच माणसे असलेल्या या वारीत उघड्यावर शौच

करणे हा त्यांचा नाईलाज होता. मग उपाय म्हणून तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर महाराज या दोन्ही प्रमुख पालखी मार्गावर संडास करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'सेवा सहयोग' या संस्थेच्या माध्यमातून 'निर्मल वारी' या बॅनरखाली पोर्टेबल टॉयलेट उपलब्ध करून द्यावेत अशी कल्पना पुढे आली.

२०१५ साली लोणी आणि यवत या गावांत सुरू झालेल्या या प्रकल्पाचा प्राथमिक टप्पा म्हणजे जमा झालेली मानवी विष्ठा सदर मुक्कामाच्या ठिकाणीच रिकामी करण्यासाठी स्थानिक गावकऱ्यांचे प्रबोधन सुरू करणे हा होता. सदर मानवी विष्ठा मातीमध्ये व्यवस्थित जिरवल्यावर तेच सोनखत म्हणून शेतीसाठी वापरता येणार होते व सोबतच गाव देखील स्वच्छ राहणार होते हे गावकऱ्यांच्या लक्षात आणून दिले गेले व त्यांनी देखील मोठ्या आनंदाने यात सहभागी होण्याची तयारी दाखवली. हा प्रयोग यशस्वी होण्यासाठी राजीव व रणजित खेर यांच्या टीमने जी मदत केली ती अफलातून म्हणावी अशी होती.

या दोन गावांत हा प्रयोग यशस्वी झाल्यावर पंढरपूरचे तत्कालीन सीईओ श्री तुकाराम मुंढे यांनी ताबडतोब 'निर्मल वारी' या संकल्पनेच्या सदस्यांना बोलावून चर्चा केली व पंढरपूर येथे सदर प्रकल्प राबवण्यासाठी शक्य ती सर्व मदत शीघ्रतेने पुरवली. त्यावर्षी पंढरपूर येथे देखील हा प्रयोग राबवला गेला. फक्त ३ गावांत सुरू झालेला हा महत्त्वाचा प्रकल्प पुढच्याच वर्षी ३० गावांमध्ये सुरू करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र सरकार तर्फे तात्काळ निधी उपलब्ध करून दिला.

सुरवातीच्या वर्षी 'निर्मल वारी' हा प्रयोग राबवताना ज्या त्रुटी लक्षात आल्या त्या नोंदवून घेत काय काय उपाय करावेत याचा एक पक्का आराखडा उभा लागला. उदाहरणार्थ टॉयलेट मध्ये जमा होणारी मानवी विष्ठा आधीच खड्डा करून ठेवलेल्या शोष खड्ड्यात रिकामी करून तेच टॉयलेट पुन्हा स्वच्छ करून पुढच्या मुक्कामी पोहोच करत करत शेवटपर्यंत जाणे हा पैसे वाचवणारा उत्तम पर्याय आहे हे लक्षात आले. तसेच कुठेतरी एकाच ठिकाणी मोठा लाईट बसवल्याने दरवाजा लावल्यावर टॉयलेट मध्ये अंधार होतो किंवा टॉयलेट मध्ये पाणी नसेल तर माणसं ते टॉयलेट वापरण्यास नकार देतात अशा एकेक गोष्टी लक्षात येऊ लागल्या. मग याची नोंद घरून पुढील वर्षी प्रत्येक टॉयलेट मध्ये वीज व्यवस्था, पुरेसे पाणी पुरवले गेले. एवढेच काय पण या प्रयोगात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी ग्रामीण भागातून आलेल्या वारकऱ्यांना संडासात कसे बसायचे याचे देखील वेळप्रसंगी प्रबोधन केले आहे.

२०१५ साली फक्त ३ गावं, रोटेशन पद्धतीने फिरवले जाणारे काही अडीचशे पोर्टेबल संडास आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे व त्या माध्यमातून गोळा झालेले १५०० स्वयंसेवक इथपासून सुरू हा प्रवास त्याच्या पुढच्या वर्षी म्हणजे २०१६ साली रोटेशन पद्धतीने मोजल्यावर २१ हजार पोर्टेबल संडास, ९ हजार स्वयंसेवक (यात ४०० विद्यार्थी) आणि ३० गावांत पोहोचला. तर २०१९ साली रोटेशन पद्धतीने मोजल्यावर २८ हजार पोर्टेबल संडास, साडे-बारा हजार स्वयंसेवक (यात ४८५० विद्यार्थी) इथपर्यंत पोहोचला आहे. यासाठी जवळपास सहा महिने आधी नियोजन केले जाते, प्रत्यक्ष वारीत रोजच्या रोज कामाचा आढावा घेतला जातो.

हाच यशस्वी प्रयोग आता महाराष्ट्रात धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक कारणामुळे ज्या ज्या ठिकाणी सोशल गॅदरिंग होते त्या प्रत्येक ठिकाणी राबवला जात आहे हे निर्मल-वारी योजनेचे महत्त्वाचे फलित आहे.

निर्मल-वारीच्या यशस्वीतेसाठी सरकार सोबतच 'सेवा सहयोग' संस्था, राष्ट्रीय सेवा योजना, श्री संतोष

---

तुम्हाला ज्या विषयाची माहिती आहे त्याविषयी कमी बोला,
आणि ज्या विषयाची माहिती नाही त्या विषयी मौन पाळा.

दाभाडे, श्री संदीप जाधव, श्री नरेंद्र वैशंपायन, श्री राजेश पांडे, श्री सुदर्शन चौधरी, श्री माउली कुडले, श्री वसंत अमराळे आदी मंडळी राबत असतात. याशिवाय हजारो स्वयंसेवक या कार्यासाठी स्वतःचे पैसे खर्च करून रात्र-रात्रभर पावसात उभे असतात.

हे सगळे लोक करत असलेल्या कामाची तुम्हाला व्याप्ती लक्षात यावी म्हणून सांगतो. गेल्या चार वर्षात या अभियाना अंतर्गत चार कोटी लिटर मानवी विष्ठेची विल्हेवाट योग्य ठिकाणी लावण्यात आली आहे. कल्पना करा ही एवढी घाण आपल्या रस्त्यांवर पसरली असती तर किती समस्या उभ्या राहिल्या असत्या?

हा आपल्या देशाचा, आपल्या समाजाचा, आपल्या धर्माचा प्रश्न नाही काय? आपल्याला आपल्या परंपरांकडे फक्त भाबड्या व उदासीन दृष्टिकोनातून बघून चालणार आहे का? आपल्या समस्या सोडवण्यासाठी कुणी परग्रहावरील लोक येणार आहेत काय? आपल्या धर्म व संस्कृतीला पाण्यात पाहणारे लोक वगळता 'अमुक झाले पाहिजे, तमुकला काय कळते' आदी उंटावरून शेळ्या हाकणारे व सोशल मीडियावरील ट्रोलिंग म्हणजेच धर्म व समाजकार्य समजणारे हायपर ऍक्टिव्ह तथाकथित हिंदुत्ववादी देखील प्रत्यक्षात काहीही न करता फक्त निराशा, नकारात्मकता व अस्वस्थता पसरवू शकतात हे लक्षात ठेवून त्यांच्यापासून अंतर ठेवून राहिले पाहिजे.

बाकी, एवढं सगळं करूनही अद्याप संपूर्ण वारी स्वच्छ झाली आहे काय ? अद्याप डोळ्यांसमोर असलेले लक्ष्य प्राप्त झाले आहे काय ? तर नाही. निश्चितच नाही. पण एक दिवस नक्कीच १००% पंढरपूर वारी निर्मल होणार याबद्दल माझ्या मनात कुठलीही शंका नाही. ते प्रत्यक्षात येण्यासाठी जिथं योग्य तिथं आपण लेखन व इतर माध्यमं वापरूच पण कधीकधी आपल्याच समाज व धर्मातील समस्या आपल्यालाच प्रत्यक्षात हात घालून त्या रस्त्यावर देखील सोडवाव्या लागतील हे लक्षात ठेवले पाहिजे. हेच आपले कर्तव्य आहे आणि यातच आपल्या समाजाचे व राष्ट्राचे हित आहे. तुम्हाला शक्य झाल्यास 'निर्मल-वारी' अभियानामध्ये सामील व्हा.

**- तुषार दामगुडे**
पुणे

●●●

---

(पृष्ठ क्र. १५ वरून - **शिवराज्याभिषेकाचा आनंद सोहळा**)

(सतराव्या शतकातल्या) कोणत्याही माणसाचं विग वगैरे घातलेलं रेखाचित्र साधारणपणे तसंच दिसतं हे माझं मत आहे.

शेवटी दोन महिन्यांपूर्वी - एप्रिल २०२२ मध्ये - ह्या हेन्री ऑक्झिंडेनचं तैलचित्र एका प्रायव्हेट कलेक्शनमधून लंडनमध्ये लिलावाला आलं. आपल्या महाराजांना रायगडावर प्रत्यक्ष राज्याभिषेकाच्या दिवशी भेटलेला हा माणूस खरा कसा दिसत होता हे पहायचे असेल तर सोबतचा त्याचा फोटो नक्की पहा. जॉन रायली नावाच्या ऑक्झिंडनच्या समकालीन चित्रकाराने काढलेले हे चित्र आहे. दोन महिन्यांपूर्वी सुमारे सात लाख रुपयांना हे लंडनमध्ये लिलावात विकले गेले.

खरं म्हणजे हेन्रीचं हे तैलचित्र पाहिल्यावर मनाला अजूनच रुखरुख लागून रहाते की, ह्याचं तैलचित्र तर पहायला मिळालं पण आपल्या महाराजांचं असं एखादं समकालीन काढलेलं तैलचित्र कधी उपलब्ध झालं तर - खरंच तो सुवर्णदिवस असेल!

आपण वाट पाहू या!

**- संकेत कुलकर्णी**
लंडन

●●●

---

# पुस्तक परिचय : मोठी तिची सावली

*मीना खडीकर यांनी लिहिलेल्या मोठी तिची सावली या पुस्तकातून भारतरत्न, गानशारदा लता मंगेशकर यांचे नितांत सुंदर शब्दचित्र उभे केले आहे. या पुस्तकाचा परिचय – संपादक*

माझ्या मते, लता मंगेशकर यांचे चरित्र योग्यतेने लिहिले आहे अशी एकमेव व्यक्ती आहे मीना खडीकर. कारण दीदींसोबत सर्वाधिक काळ घालवलेल्या त्या सर्वात जवळच्या व्यक्ती आहेत. त्यांनीच ते लिहिलेही आहे. भारतरत्न, गानशारदा लतादीदींचे नितांतसुंदर शब्दचित्र त्यांनी उभे केले आहे. हाती धरल्यापासून खाली ठेववत नाही असे हे पुस्तक आहे. लताचे चरित्र, मीना यांचे निरूपण आणि प्रवीण जोशींसारखा शब्दप्रभू शब्दांकनाला, असा समसमा संयोग लाभल्याने पुस्तक खूपच सुरस झालेले आहे. शिवाय, परचुरे प्रकाशनाच्या इतमामाला शोभेलसे मुद्रण, तसेच पुस्तकाचा कागद, आकार आणि प्रकार सारेच देखणे आहे. हवेहवे असे आहे. लताच्या असंख्य मराठी चाहत्यांनी ते अवश्य वाचावे! लताविषयी प्रत्येकासच जाणून घ्याव्या वाटणाऱ्या अपार गोष्टींबाबतचे कुतूहल नक्कीच शमेल अशी खात्री या पुस्तकाबाबत देता येईल.




या पुस्तकाला गुरुदेव शंकर वासुदेव अभ्यंकर यांची सुरेख प्रस्तावना आहे. पुस्तकाची सम्यक ओळख कशी करून द्यावी याचा तो जणू वस्तुपाठच आहे. हे पुस्तक जेवढे सुंदर आहे तेवढीच ही प्रस्तावनाही सुंदर आहे. वाचनीय आहे.

कस्तुरी मृगाला क्वचितच याची जाणीव असते की, आपल्यापाशी कस्तुरी आहे. मात्र काही विरळ व्यक्ती अशी असतात, ज्यांना हे माहीत असते की, आपल्यापाशी काय आहे, ईश्वराने आपल्या पदरात काय बांधले आहे. त्या व्यक्ती असतातही लोकोत्तर आणि त्यांना सर्वकाळ हे माहीतही असते की, आपण लोकोत्तर आहोत. त्या सर्वसामान्यांसारख्या वागत नाहीत आणि अलौकिक वागूनच, अलौकिक ख्याती प्राप्त करत असतात. लता मंगेशकरही त्यातीलच एक आहेत. नरेंद्र मोदीही त्यातलेच आहेत. बाबा रामदेवही त्यातलेच आहेत आणि योगी आदित्यनाथही त्यातलेच आहेत.

आसेतुहिमाचल पसरलेल्या आर्यावर्तातच नव्हे तर संपूर्ण अवनीतलावर ज्यांना सारेच ओळखत असतात, किमान त्यांचे गाणे ऐकल्यावर ज्यांची ओळख पटतेच पटते अशा आहेत लतादीदी. त्या सगळ्यांच्या ओळखीच्या गायिकेच्या, माणूस म्हणूनच्या जीवनात, दार किलकिले करून पाहण्याचे कुतूहल तर प्रत्येकातच असते. त्या कुतूहलपूर्तीस अंजाम देण्याकरताच जणू हे पुस्तक मीनाताईंनी लिहिले आहे. सुमारे दोनशे पानांच्या पुस्तकात हे सारे सामावणे खरे तर अवघडच आहे, मात्र ही साठा उत्तरांची कहाणी त्यांनी पाचा उत्तरांत लीलया सुफळ संपूर्ण केलेली आहे. मला आवडली आहे. तुम्हालाही आवडेल असा विश्वास वाटतो.

---

सौंदर्य हे वस्तूत नसते, पाहणाऱ्याच्या दृष्टीत असते.

मीनाताई लिहितात, ''आम्ही पाचही भावंडे लहानपणापासून संगीतक्षेत्र इतक्या जवळून पाहत आलो की, त्याबाहेर काही जग असते हे आम्हाला जणू ठाऊकच नव्हते. संगीत हेच आपले कार्यक्षेत्र आहे हे ठरूनच गेल्यासारखे होते. लहान मुले अंगणात खेळतात तसे आम्ही नाटक कंपनीच्या आवारात वाढलो. बाबांच्या जलशांत बागडलो. नंतर दीदीच्या रेकॉर्डिंगला जाऊन तिथलाही आनंद मनसोक्त लुटला. दीदीचा हात धरून आम्हीही सारेजण याच क्षेत्रात आलो, रमलो. घरात येणारी सून कोण असणार यावरही एकमत झाले होते. दामुअण्णा मालवणकरांची मुलगी. दामुअण्णा बाबांच्या बलवंत संगीत मंडळीत होते. बाबांचे मोठेपण त्यांनी जवळून पाहिलेले होते. आमच्या कुटुंबाची त्यांना जवळून माहिती होती. बाबांच्या अखेरच्या काळापर्यंत त्यांच्याशी एकनिष्ठ राहणारी जी मोलाची माणसे होती, त्यातलेच होते दामुअण्णा मालवणकर. स्वतः फार मोठे कलाकार. नाट्य आणि चित्रपट क्षेत्रांत त्यांचा लौकिक होता. स्थळाची माहिती काढायचा काही प्रश्नच नव्हता. वधूपरीक्षा वगैरे नावालाच.''

अशा प्रकारे निवडलेल्या या सुनेची मला मात्र एके दिवशी अवचितच ओळख झाली. मी एका गाण्याचा अनुवाद करत होतो. गाणे होते १९६३ सालच्या गृहस्थी सिनेमातले, 'जीवन ज्योत जले'. भारती मालवणकर आणि निरुपा रॉय यांच्यावर चित्रित झालेले हे गाणे ऐकायला नादमधुर आणि श्रवणीय तर आहेच, मात्र पहायलाही नेत्रसुखद आहे. हे माझ्या आवडत्या गाण्यांतले एक आहे. https://anuvad-ranjan.blogspot.com/2021/11/blog-postš30.html. तर सांगायचा मुद्दा हा की, हृदयनाथ मंगेशकरांची जीवनसंगिनी त्या पाचही मंगेशकर भावंडांत कोंदणात हिरा दिसावा एवढी चपखल बसणारीच आहे.

मराठी मुलीने, आपल्या मराठी बहिणीचे अलौकिक चरित्र सांगतांना तिला 'दीदी' अशी हाक हिंदीत का बरे मारावी! मीनाताई म्हणतात – दीदी हा हिंदी शब्द 'दादा' या मराठी शब्दाचे स्त्रीरूप असावा. कर्त्या दादाने एकत्र कुटुंबाचा प्रतिपाळ करावा तसाच दीदींनी मंगेशकर कुटुंबाचा प्रतिपाळ केला. त्यामुळे शुद्ध मराठमोळ्या घरादाराने 'दीदी' या हिंदी शब्दास मराठी भाषेत सन्मान मिळवून दिला.

मीनाताई म्हणतात, ''दीदीने 'आनंदघन' या नावाने संगीतकार म्हणून बरंच काम केलेले आहे. या आनंदघन नावाचे रहस्य काय असे बरेचजण विचारतात. या नावामागे तिच्या भाचरंडांचे प्रेम आहे. आशाच्या मुलाचे नाव आनंद आहे. त्याच्यावर दीदीचा विशेष जीव. आनंदघन हे नाव त्याच्या नावावरून घेतले आहे. घरात आनंदचे खास लाड व्हायचे. त्याला आवडायचे म्हणून दीदी स्वतः कोथिंबिरीचे मटण करून खायला घालायची. पुढे भालजी पेंढारकरांनी 'योगेश' हे नाव कवी म्हणून स्वीकारले ते माझ्या मुलाच्या नावावरून''.

संगीतकार म्हणून लतादीदींच्या कर्तबगारीच्या आठवणी सांगतानाच, मीनाताईंनी पंडित दीनानाथ मंगेशकरांची एक आठवण अशी दिलेली आहे की, ''परंपरेने चालत असलेल्या चालींत बाबांनी स्वतःच्या प्रतिभेने बदल केले होते. त्यांनी मानापमानातल्या गाण्यांच्या चाली बदलल्या होत्या तेव्हा किती गहजब उठला होता. पण नंतर त्याच चाली रूढ झाल्या; अधिक अर्थवाही म्हणून मान्यता पावल्या. याला कारण म्हणजे बाबांचा संगीतकार म्हणून असलेला वकूब. शब्दांची आणि सुरांची समज''. लताबद्दल त्या म्हणतात, ''ती चित्रपटातला प्रसंग समजून घेते आणि केवळ एकच सूर धरून ठेवून हातात गाण्याचा कागद घेऊन ती संपूर्ण चाल सलग पूर्ण करते. ती चाल करते असे म्हणण्यापेक्षा तिला चाल स्फुरते. स्त्रियांना जात्यावर ओवी स्फुरावी तशी. पण तिच्या चाली सहज सुचलेल्या

असल्या तरी सहज गाता मात्र येत नाहीत. त्या लोकप्रिय असल्या तरी उथळ नसतात. शब्दाची मोडतोड नाही, अकारण हेल नाहीत, कृत्रिमता तर नावालाही नाही. त्यांच्यामागे दीदीचे केवळ स्वरच नाही, तर संस्कारही उभे असतात, त्या संस्कारांतला बाळबोधपणा पेलणे फार अवघड. अस्सल मराठमोळी निरागसता जपणेही कठीणच''.

'मराठा तितुका मेळवावा' चित्रपटाविषयीची एक आठवण त्या अशी सांगतात की, ''अखेरचा हा तुला दंडवत या गाण्यात दीदीला दऱ्याखोऱ्यांमध्ये घुमणाऱ्या आवाजाचा परिणाम हवा होता. तिने 'तुला दंडवत' असे गायिले की पाठोपाठ तिच्याच आवाजाचे प्रतिध्वनी उमटावेत अशी कल्पना होती. पण असा परिणाम साध्य करण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान तेव्हा उपलब्ध नव्हते. मग तिने मला आणि उषाला तिच्या मागे थोड्याथोड्या अंतरावर गायला उभे केले. तिने 'तुला दंडवत' असे गायिले की आम्हीही ते शब्द तिच्या पाठोपाठ तालात गायचो. आजही ती रेकॉर्ड ऐकतांना तो तिचाच प्रतिध्वनी वाटतो. आम्ही आहोतच दीदीचे प्रतिध्वनी''.

मीनाताई सांगतात, ''दीदी नेमक्या शब्दांत योग्य भाव व्यक्त करणारी लेखिका आहे. तिच्या लेखनात काव्यदृष्टी असते तसाच तार्किक परखडपणाही असतो. तिला अतिशय समृद्ध आणि डौलदार मराठी अवगत आहे. तिचे वाचनही साक्षेपी आहे. नव्याजुन्या अनेक लेखकांची पुस्तके तिने रसज्ञपणे वाचलेली आहेत. त्यातले संदर्भ तिच्या जिभेवर असतात. संतकवींपासून आधुनिक कवी आणि वेगवेगळे शायर यांच्या रचनाही तिला मुखोद्‌गत आहेत. दीदी मराठीबरोबरच इतरही अनेक भाषा मातृभाषेच्या सफाईने बोलू शकते. त्यातल्या सौंदर्यस्थळांची तिला उत्तम जाण आहे. बांगला भाषेचे तिला पहिल्यापासूनच आकर्षण आहे. रवींद्रनाथ टागोर, शरदबाबू, विवेकानंद तिने मुळातून अभ्यासले आहेत. मामा वरेरकरांनी केलेला शरदबाबूंच्या साहित्याचा अनुवादही तिने वाचलेला आहे. बंगालची भाषाच नव्हे तर बांगला जीवनशैलीही तिला आकर्षित करते''.



भालजी पेंढारकर यांनी १९५२ साली निर्मिलेल्या 'छत्रपती शिवाजी' चित्रपटातील 'आज शिवाजी राजा झाला' गाणे चित्रित करताना लतादीदी.

**लता दीनानाथ मंगेशकर**
**जन्मः** २८ सप्टेंबर १९२९ इंदौर,
**मृत्यू:** ६ फेब्रुवारी २०२२, मुंबई.
**संदर्भः** मोठी तिची सावली, मीना मंगेशकर-खडीकर,
**शब्दांकनः** प्रवीण जोशी, परचुरे प्रकाशन मंदिर,
**तिसरी आवृत्तीः** २८ सप्टेंबर २०२०, रु.२०४/-, एकूण पृष्ठे-२३१.

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# पूर्व विदर्भातील अश्मवर्तुळांचे गूढ विश्व

*पूर्व विदर्भातील सुमारे ३००० वर्षांपूर्वीच्या शिलावर्तुळांचा/दफनभूमिंचा ऊहापोह प्रस्तुत लेखात केलेला आहे - संपादक*



जुनापाणी



मांडवगोटा

अश्मयुग, ताम्रयुग, लोहयुग असे जगण्याच्या प्रगतीचे, प्रवासाचे कालखंड. असाच एक कालखंड म्हणजे महापाषाण युगाचा. काळ असावा सुमारे ३००० वर्षापूर्वीचा. महापाषाणयुग विदर्भभूमिच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचं. या कालखंडातले अवशेष याच भूमीवर सर्वाधिक प्रमाणात आढळतात. महापाषाण म्हणजे मोठे- प्रचंडमोठे पाषाण. अशा मोठ्या पाषाणांनी केलेल्या निर्मितीचं युग म्हणजे महापाषाण युग. ही निर्मिती थक्क करणारी. मोठमोठ्या पाषाणांनी- दगडांनी निर्माण केलेली अश्मवर्तुळं/शिलावर्तुळं मुख्यत: पूर्व विदर्भात दिसून येतात. त्यांची संख्या सुमारे ३५०० च्या जवळपास असावी.

वास्तवात ही रहस्यमयी शिळावर्तुळे काय आहेत? ती कुणी तयार केलीत? ती मानवनिर्मित आहेत की नैसर्गिक? की काही दैवी चमत्कारी? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यात बराच कालावधी गेला. खरे म्हणजे, इतिहासाचा व संस्कृतीचा शोध घेण्यासाठी काही पुरातत्वीय पुराव्यांचा शोध घ्यावा लागतो. शेवटी या गुढ अश्मवर्तुळांचा शोध घेण्यासाठी विदर्भात १८६७ साली रिव्हेट कॉरनॅक याने जुनापाणी, १८६९ साली पिअर्स यांनी कामठी व १८७१ मध्ये कॅरी यांनी खौरवाडा येथे उत्खनन केले. यापूर्वी आंध्रप्रदेशातील ब्रह्मगिरी येथे असेच उत्खनन करण्यात आले होते. या उत्खननानंतर त्यातून त्याकाळची मानवी सभ्यता, संस्कृती, कला, जीवनमान यांची एकत्रित माहिती समोर आली.

अश्मवर्तुळांच्या उत्खननात अभ्रकयुक्त मातीची भांडी, चाकू, कढ्या, लोखंडी झाकण्या, नांगरांचे फाळ, मानवी सांगाडे तर काही अश्मवर्तुळात फक्त अस्थी दिसून आल्यात. ही अश्मवर्तुळे म्हणजे त्याकाळी दफनपद्धती होती, हे तज्ज्ञांचे मत आहे. मृतदेहासोबत त्याच्या आवडीच्या वस्तू, प्रसंगी पाळीव प्राण्यांनाही दफन करण्यात येत होते.

याच पुराव्यावरून तेंव्हाचा मानव हा विदर्भातील आद्य शेतकरी होता, हे सिद्ध झाले आहे आणि त्यामुळे पूर्व विदर्भाच्या प्राचीन इतिहासावरही प्रकाश पडला आहे. त्या काळचा पूर्व विदर्भ म्हणजे आताचे नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गोंदिया व गडचिरोली हे जिल्हे.

अनेक लहान लहान मानवी वस्त्यांनी त्याकाळी व्यापलेला हा भूभाग. भरपूर पर्जन्यमान, सुपीक जमिनी, झाडाझुडपांनी नटलेली वनराई आणि बारमाही वाहत्या नदीनाल्यांनी आबादानी झालेला हा प्रदेश. अर्थात शेती आणि पाळीव प्राण्यांचे संगोपन हा येथील रहिवासीयांचा मुख्य उद्योग. अशा गटसमुहाचं नेतृत्व त्यातल्याच एखाद्या नरश्रेष्ठांकडे असायचे. हा नटवरसुद्धा आपली सर्व शक्ती, बुद्धी सर्वाथानं या समुदायाच्या भलेपणासाठीच खर्च करायचा. तसा मानव हा काळाच्या प्रचंड कालौघातला क्षणजीवी प्राणी. त्यामुळे मर्त्यच. पहिला आणि शेवटचा श्वास असेपर्यंत तो सतत सुखी सहजीवनाच्या शोधात असलेला, प्रयत्नरत असलेला. मात्र, श्वासाचा शेवटचा धागा हातून निसटताच ती काया अर्थहीन होते. मग अशा मृत माणसाच्या सहोदरांनी त्याचे कर्तृत्व, समुहासाठी केलेले प्रयत्न या सद्गुणांना अमर करण्याच्या उद्देशाने जेव्हा काळालाच (देवाला) प्रार्थना करून योग्य मार्गदर्शन करण्यास साकडे घातले असेल, तेंव्हा काळाने सुद्धा उपलब्ध असणाऱ्या संसाधनातून अशा मृतांच्या दफनभूमिभोवती दगडी गोलाकार वर्तुळे रचण्याचे सुचवून त्यांच्या आठवणी सुरक्षित करण्यास सांगितले असावे.

काहीही असो, सुमारे ३००० वर्षांपूर्वीच्या पूर्वजांनी निर्माण केलेली अश्मवर्तुळे पूर्व विदर्भाच्या पाच जिल्ह्यात मोठ्या संख्येने आढळतात. नागपूर-काटोल मार्गावर फेटरी, कळमेश्वर, वडधामना, माहूरझरी, धर्तीमूर्ती, दत्तेरगांव, जुनापाणी, आदासा, बोरगांव, हिंगणा येथे ही अश्मवर्तुळे मोठ्या प्रमाणात आहेत. वर्धा जिल्ह्यात धाम नदीच्या काठावर अशी १५०० अश्मवर्तुळे आढळली आहेत.

तिकडे चंद्रपूर जिल्ह्यात चिमूरपासून पुढे हिरापूर नावाच्या गावाजवळ मांडवगोटा हे असंच एक आश्चर्य. या स्थानी अश्मवर्तुळांची जागा गोट्यांच्या/दगडांच्या मांडवांनी घेतली आहे. लहान मुलं पत्त्यांचा बंगला बनवतात तसा. म्हणजे घराच्या भिंतीसारखे चार पत्ते ठेवावे आणि वर एक पत्ता स्लॅबसारखा, पण दगडाचाच. अखंड आणि प्रचंड मोठ्या आकाराचे दगड. सुमारे सहा ते सात फूट उंच. बारा ते पंधरा फूट लांबी रूंदीची अशी दोन खणांची खोली. प्रत्येक दगडी भिंत दोन अडीच फुटांच्या जाडीची आणि यावर एकच दगड स्लॅबसारखा. एकेक भिंत म्हणजे एकेक दगड. मांडवगोटा ही विशिष्ट पद्धतीची दफनाची जागा. प्रचंड अशी शवपेटिका. या मुख्य खोलीभोवती आणखी इतर छोट्या पेटिका आहेत. मुख्य खोलीत दोन दालनं. एकीकडच्या दालनाचा छतापासून जमिनीपर्यंतच्या उंचीचा दरवाजा. दुसऱ्या दालानाचा दगडातच कोरलेला. रूंदीच्या तीनेक पट उंच. इतर भिंतीत द्वारं नाहीत. या भिंती नैसर्गिक दगडं नाहीत. दगड तासून, कोरून, कापून तयार केलेल्या आहेत. प्रचंड आकारावरून वजनाची कल्पना येतेच. शिवाय भिंतीचा कांही भाग जमिनीतही असेलच. इतक्या मोठ्या दगडी भिंती निर्माण करणं, त्या उभ्या करणं आणि त्यावर प्रचंड असा एक दगड छत म्हणून लावणं, हे काम आजच्या तंत्रज्ञानाच्या दृष्टीनंही आव्हानच आहे. त्यातही त्या प्रचंड दगडात कोरलेले दरवाजे तर परिसीमाच आहेत. ही मोठी खोली आणि आजूबाजूला असलेल्या इतर छोट्या पेटिका काही विशिष्टता दर्शवतात. एकंदरीत, मानवी शक्तीच्या बाहेरचं काहीतरी विस्मयकारी समोर यावं असं हे गूढ गारूड.

मृत व्यक्तीला दफन केल्यावर त्या जागेभोवती केलेल्या मोठमोठ्या पाषाणांची वर्तुळाकार रचना म्हणजे शिलावर्तूळ. हे विदर्भाचं वैशिष्ट्य आहे. पण, ही खोलीसारखी रचना एकमेव आहे. महाराष्ट्रात आणि कदाचित देशातही. या मांडवगोटा परिसरातली शांतता हुरहुर लावणारी आणि अस्वस्थ करणारी, तरीही अंतर्बाह्य व्यापून टाकणारी. आदिम स्मृती नि:शब्द जपणारा मांडवगोटा.

शिलावर्तूळ असो की एका खोलीची दगडांची मांडवासारखी असणारी दफनभूमी असो, आदिमानवापासून आतापर्यतच्या इतिहासाची ती साक्ष आहेत. मानवाच्या या प्रवासात अनेक स्थित्यंतरं घडलीत. परिस्थिती कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल. कधी निसर्गाशी संघर्ष करत, तर कधी जुळवून घेत ही दुर्दम्य जीवनेच्छा प्रवाहीत होत राहिली. टोळ्यांनी राहणाऱ्या माणसांत नाती निर्माण झालीत. आचार-विचारांचे नियम ठरू लागले. जीवन स्थिर झाले आणि निश्चित होऊन नांदू लागले. अशाप्रकारे उत्क्रांतीच्या पर्वातून जात एकेका कणानं ज्ञानाचं संपादन करत विकसित होत जाणाऱ्या विकासाच्या पाऊलखुणा विदर्भाच्या भूमीनं अशा शिलावर्तुळांच्या रूपात जतन करून ठेवल्या आहेत.

शांतवृत्तीनं या दगडी वर्तुळांचे चिंतन केल्यास आपणांस सहजच महापाषाण युगातल्या मानवाविषयी अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. तुम्हीच बघा, जिथं ही शिलावर्तूळ आहेत, तिथल्या त्या शिळा असाव्यात असं कदाचित नसावं. या शिला आहेत, त्या आकारातही नसाव्यात. मोठ्या शिलाखंडातून त्या शिला निर्माण करणं आणि त्या वाहून आणणं हे शिलांचा आकार आणि संख्या पाहता अविस्मरणीय आहे. त्यामुळे हे कार्य त्या माणसांविषयीचं गूढ अधिकच गहिरं करते.

मृत्यू कोणचाही असो, सद्याच्या काळात 'बराऽ होताऽऽ गाऽऽऽ' असं म्हणून तिसरा, दहावा, तेरावा, चौदावा दिवस करून जबाबदारी संपली असे समजून आपण आपली कामे करण्यास मोकळे होतो. हळूहळू त्या मृतात्म्या विषयी वाटणारी कळकळ महिन्या-दोन महिन्यांत उतरणीस लागते. पण आदिमानवाचे तसे नव्हते. त्याच्या प्रिय व्यक्तीच्या मृत्युनंतर आदर म्हणून निर्माण केलेली शिलावर्तुळे अजूनही आपणास ३००० वर्षांपूर्वीच्या कालौघात जाण्यास भाग पाडते. मृत पावलेले सुखात्मे आणि त्यांचे सहोदर आज आपल्यात नसले तरी, पूर्व विदर्भात आढळणारी ३५०० शिलावर्तुळं 'मुमताज-शहाजहानच्या ताजमहाला' सारखीच त्या आपल्या पूर्वजांची आठवण म्हणून तेजोमहालांच्या रूपात उघड्यावर ऊन, वारा, पाऊस यांना सुखा-समाधानाने वर्षानुवर्षे झेलत दिमाखात उभी आहेत.

नागपूर-अमरावती महामार्गापासून ही शिलावर्तुळे अगदी हाकेच्या अंतरावर. हे अंतर पाहिलं तर काही पावलांचं आणि अनुभवलं तर सहस्त्रकाचं.

काही असो, शिलावर्तुळांचं असणं वर्तमानानं स्वीकारायला हवं. कारण त्या दगडांचं असणं म्हणजेच त्या कोणे एकेकाळी असलेल्या मानवाचं असणं आहे. ह्या माणसाचं असणं जेवढं या भूमीनं साजरं केलं, तेवढंच त्यांच्या नसल्याचं स्मरणही या शिलावर्तुळांच्या रूपानं देखणं केलेलं आहे.

इसासनी नजीकच्या त्या शिलावर्तुळांजवळ अंमळ थांबलो असता मला जाणवलं, समाजाचा विचार करून जगणं म्हणजेच आयुष्य होय..... मेल्यानंतर सोबत नेता ते तुमचे कर्म. तुमच्या प्रती असलेली समाजाची आपुलकी आणि वर्षानुवर्षे काढली जाणारी तुमची आठवण हीच आयुष्यभराची कमाई असते.......

येताना एकटे असलो तरी जातांना मात्र सर्वांचे होऊन जाण्यातच खरी मजा आहे........!

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी,
उज्ज्वल नगर, नागपूर - ४४००२५
मो.९७६६०२३४१५,७७५८०२५३३४
ई मेल -wandalkardilip@gmail.com

●●●

या जगात कुठलीच गोष्ट कायम स्वरुपी रहात नाही, तुमचं दु:ख सुद्धा.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## विद्या प्रसारक मंडळाची क्रीडा अकादमी

**विद्या प्रसारक मंडळाची क्रीडा अकादमी व सुप्रसिद्ध क्रिकेटपटू श्री. पॉल चंद्रशेकर वल्थाटी यांच्यात सामंजस्य करार**



विद्या प्रसारक मंडळ क्रीडा अकादमी आणि सुप्रसिद्ध क्रिकेटपटू श्री. पॉल चंद्रशेकर वल्थाटी यांच्यात सामंजस्य करार शनिवार दिनांक १८ जून २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावेळी श्री रवींद्र रसाळ व क्रीडा अकादमी कोऑर्डिनेटर सुदर्शन जोशी उपस्थित होते. या अकादमीमुळे विद्या प्रसारक मंडळ मध्ये चालणाऱ्या क्रीडा उपक्रम अजुन उत्स्फूर्तीने वेग घेईल. पॉल है भारत संघामधून अंडर १९, तसेच इंडिया ब्लू खेळले आहेत व आईपीएलमधे सर्वात वेगवान भारतीय शतकवीर आहेत. तसेच रणजी ट्रॉफीमधे सुद्धा त्यांची कारकीर्द ही मोलाची आहे. या कराराने आपले विद्यार्थी तसेच ठाणे जिल्ह्यातील क्रिकेट खेळणाऱ्या क्रिकेटपटू आणि विद्यार्थांना एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा विद्या प्रसारक मंडळाचा प्रयत्न आहे असे डॉ विजय बेडेकर याप्रसंगी म्हणाले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**सामाजिक उत्तरदायित्व योगदान निधी रुपये १२ लाख ५० हजार पाचशे प्राप्त**

झुव्हेंटस हेल्थकेअर लिमिटेड या कंपनीच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व योगदान निधी रुपये १२ लाख ५० हजार पाचशे महाविद्यालयाला प्राप्त झाला. हा निधी पालघर जिल्ह्यातील मोखाडा परिसरामध्ये व्यवसायिक शिक्षण व उद्योजकता या क्षेत्रात संशोधन व काम करण्यासाठी मिळाला. जनसंज्ञापन विभागातील प्राध्यापिका डॉ संगीता दास यांच्या प्रयत्नातून हा निधी मिळाला.

**जागतिक सायकल दिन**



दिनांक ३ जून रोजी विद्या प्रसारक मंडळा तर्फे 'जागतिक सायकल दिनानिमित्त' सायकल फेरी चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल नारायण बारसे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुचित्रा नाईक व अन्य प्राध्यापक व सहकारी यांनी सहभाग घेतला

**आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा**

दिनांक २१ जून २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना.गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयांमध्ये प्राचार्या डॉ. सौ सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या डीएलएलई, एनएसएस आणि एनसीसी नौदल पथक यांच्यामार्फत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाला ठाण्यातील विवेकानंद स्टडी सर्कल यांचे सहकार्य लाभले. तर या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या कात्यायन या सभागृहात करण्यात आले होते.



योग दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी 'योगाचे आपल्या जीवनातील महत्त्व'या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या सौ. वंदना पिंपरीकर आणि सौ. प्राची वाघ यांनी प्रात्यक्षिक योग सत्राचे संचालन देखील केले. त्यानंतर मान्यवर अतिथी वंदना पिंपरीकर यांनी 'योगाची मानवी जीवनातील गरज' या विषयावर भाषण केले.

या उपक्रमात एकूण ९६ विद्यार्थी व २४ शिक्षकांनी सक्रिय सहभाग दर्शवला. तसेच डीएलएलईच्या प्रमुख डॉ. संगीता मोहंती, एनसीसी (नौदल) चे प्रमुख डॉ. दीपक साबळे, एनएसएसचे प्रभारी डॉ. विनोद चंदवानी, तसेच संबंधित समित्यांचे इतर सदस्य, विवेकानंद स्टडी सर्कलचे संतोष राणे, अतुल राऊत आणि दीप्ती पाटील यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

**स्टाफ अकॅडमी कार्यक्रम**

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचा स्टाफ अकॅडमीचा पहिला कार्यक्रम बुधवार दिनांक २९ जून २०२२ रोजी स्टाफरूम मध्ये पार पडला. स्टाफ अकॅडमी तर्फे जुनियर कॉलेज सुपरवायझर प्रा. टि. जे. शर्मा यांना निरोप समारंभ देण्यात आला.

याप्रसंगी बोलताना प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी शर्मा सरांना भावी आयुष्याकरता शुभेच्छा दिल्या. जुनियर कॉलेज उपप्राचार्या प्रा. संगीता दीक्षित यांनी शर्मा सरांच्या हरहुन्नरी आठवणींना उजाळा दिला.

उत्सवमूर्ती प्रा. शर्मा सरांनी आपल्या मनोगतात, 'जोशी बेडेकर महाविद्यालयात सेवा करण्याची संधी मिळाली याचा नेहमीच अभिमान वाटला' असे सांगितले. आपल्या स्वभावातील अवखळ सहजपणाला अनुसरत किस्से रंगवले. संपूर्ण स्टाफरूम हास्यविनोदात दंग झाली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा ठाकूर यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. शेफाली कोंडेवार यांनी केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन प्रा. रुपेश महाडिक यांच्या मदतीने स्टाफ अकॅडमी प्रमुख प्रा. डॉ विमुक्ता राजे यांनी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

**विद्यार्थी क्रीडा चर्चासत्र**

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या सक्षम नेतृत्वाखाली, विद्या प्रसारक मंडळाच्या क्रीडा अकादमी आणि जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या जिमखाना समितीच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसाचे विद्यार्थी क्रीडा

चर्चासत्र महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहामध्ये दिनांक ३० जून २०२२ दुपारी १२ वाजेपासून आयोजित करण्यात आले होते.

सदरच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर मॅडम होत्या. त्यांनी आपल्या भाषणामध्ये विद्यार्थ्यांच्या जीवनातील खेळाचे महत्त्व अधोरेखित करत विद्या प्रसारक मंडळाच्या नुकत्याच स्थापित झालेल्या क्रीडा अकादमीच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या विविध क्रीडा प्रशिक्षणास विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून क्रीडा क्षेत्रात यशस्वी व्हावे असे आवाहन केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेश पाटील सर सुद्धा उपस्थित राहून त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तमरीत्या क्रीडाविषयक मार्गदर्शन केले.



या चर्चासत्राच्या दरम्यान साधनव्यक्ती म्हणून फुटबॉल, बुद्धिबळ, खोखो आणि बास्केटबॉल खेळांचे विविध प्रशिक्षक अनुक्रमे प्रतीक तेलंग, सुरज पिल्लई, विवेक राणे, कमलाकर कोळी तसेच इजराइल फर्नांडो हे उपस्थित राहून त्यांनी अतिशय प्रभावीपणे विद्यार्थ्यांची संवाद साधला. प्रश्न उत्तरांच्या तासामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. क्रीडा अकादमीचे समन्वयक सुदर्शन जोशी यांनी क्रीडा अकादमीचे विजन समोर ठेवून विविध क्रीडा उपक्रमांची माहिती दिली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेत डॉ प्रमोद खराटे, क्रीडा प्रमुख, महाविद्यालयाची जिमखाना समिती, विद्यार्थी आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांची विशेष साथ लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इथान सोलोमान या विद्यार्थ्यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका रोहिणी डोंबे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच शिक्षक उपस्थित होते.

**महाकवी कालिदास दिवस**



दि. २/७/२२, शनिवार रोजी, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गर्शनाखली संस्कृत विभागाने महाकवी कालिदास दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विभागातील विद्यार्थ्यांनी कालिदासांच्या विविध रचनांवर पत्रिका सादरीकरण व ppt presentation केले. उत्कृष्ट सादरीकरणाला नामांकन देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. स्वाती भालेराव व प्रा. श्रेया मोघे यांनी प्रयत्न केले.

**सर्ज स्थापना दिन**

३ जुलै २०२२ रोजी, वि.प्र.मं. च्या के.ग. जोशी कला महाविद्यालय आणि ना.गो. बेडेकर वाणिज्य

महाविद्यालय (स्वायत्त) ठाणे च्या **सर्ज माजी विद्यार्थी संघटनेने** आपला **१९ वा स्थापना दिवस** अनोख्या पद्धतीने साजरा केला.

आपण हे वर्ष **भारताच्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष** म्हणून साजरे करत आहोत, तर ह्या पार्श्वभूमीवर संघटनेने एकूण **७५ रोपे** लावण्याचा निर्णय घेतला आहे.



तर ह्या स्थापना दिनी प्राथमिक स्वरूपात **०५** रोपांची लागवड करण्यात आली. त्यात कडुनिंब, लिंबू, पारिजात आणि कडीपत्ता या वनस्पतींची लागवड संघटनेच्या सदस्य सौ. संगीता दीक्षित, डॉ. प्रियंवदा टोकेकर, श्री. स्वप्नील मयेकर, श्री.राजेंद्र साळवी, सौ. सुप्रिया पवार, श्री. विराज पवार, श्री. नारायण कदम, श्री. तानाजी बांगर, सौ. बांगर ह्या वेळी उपस्थित होते.

विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपणासाठी परवानगी देणारे वि.प्र.मं चे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सर, सर्ज संघटनेला सतत सहकार्य करणाऱ्या प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक मॅडम आणि श्री. चंदुभाऊ ठक्कर ज्यांनी योग्य ती व्यवस्था केली. यांचे सर्ज माजी विद्यार्थी संघटना विशेष आभार मानते. तसेच सर्जचे सर्व सदस्य त्यांचेही आभार. कारण त्यांच्या पाठिंब्याशिवाय काहीही शक्य नाही. महाविद्यालयाच्या उपहारगृहात गरम चहासह सदस्यांनी त्यांच्या वेगवेगळ्या बॅचच्या आठवणींना उजाळा दिला तसेच संघटनेच्या भावी योजना व उपक्रमांवर चर्चा होऊन कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

**अनुवाद क्षेत्रातील संधी**

विप्रमंच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने ''अनुवाद एक करिअर ऑप्शन'' या विषयावर BARC चे माजी वैज्ञानिक अधिकारी श्री नरेंद्र गोळे यांचे व्याख्यान शुक्रवार, दिनांक ८ जुलै २०२२ रोजी BRIMS च्या पाणिनी सभागृहात पार पडले.

या कार्यक्रमाला जोशी बेडेकर महविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. विमुक्ता राजे, डॉ. प्रशांत धर्माधिकारी, मानसी जंगम हे उपस्थित होते. जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागाचे ६० विद्यार्थी उपस्थित होते. ज्येष्ठ अनुवादक नरेंद्र गोळे यांनी 'अनुवाद : एक करिअर ऑप्शन' या विषयी सादरीकरण करत उत्तम व्याख्यान दिले. सादरीकरणात अनेक महत्त्वाच्या विषयांना त्यांनी हात घातला. त्यात विविध उदाहरणे देत त्यांनी 'भाषांतर सेवा' हा विषय आपण आपला करिअर पर्याय कसा बनवू शकतो याचे महत्त्व सांगितले. आपण आत्ताच्या या आधुनिक व तंत्रज्ञान विकसित जगात अनेक गोष्टी सोप्या करून घेतल्या आहेत. जसे की गूगल भाषांतरच्या मदतीने आपण कोणतेही शब्द आपल्याला हव्या त्या भाषेत भाषांतर करू शकतो. इंग्रजी शब्द आपण आता आपलेसे करून घेतले आहेत. परंतु आपली मातृभाषा मराठी ही किती उत्तम आहे याची महतीही सांगितली. गोळे सरांनी व्याख्यानात काही मजेशीर कविता, संस्कृत श्लोक यांचीही उदाहरणे दिली.

तसेच भारतीय भाषेचे स्थानिकीकरण, त्याचे कौशल्य हे आपल्या भारतीय लोकांनीच विकसित केले आहे. बरेचसे शब्द-संग्रह, शब्दकोश उपलब्ध आहेत, परंतु ते आता अद्ययावत करण्याची गरज आहे, हे त्यांनी सांगितले. व्याख्यानाची सांगता करता त्यांनी एक उत्तम उदाहरण दिले. 'भाषा ही तरुण स्त्री सारखी आहे. ती सुंदर असली की प्रामाणिक नसते, आणि

प्रामाणिक असली तर ती सुंदर नसते!' असा उपहास करत भाषेची वळणदार शैली हास्यास्पद रूपात मांडली. अशा प्रकारे आपण अनुवादाकडे एक 'करिअर ऑप्शन' म्हणून देखील बघू शकतो हा विश्वास आपल्या व्याख्यानातून सर्वांना दिला.



कार्यक्रमाअंती विशेष प्रश्नोत्तरांची फेरी देखील घेण्यात आली. त्याला देखील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल

बा.ना.बांदोडकर विज्ञान स्वायत्त कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९५. ७८% लागला. ५४ विद्यार्थी विशेष प्रावीण्य श्रेणी, १६०विद्यार्थी प्रथमश्रेणी, २३३ विद्यार्थी द्वितीयश्रेणी तर ८विद्यार्थी तृतीय श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाले. कु अस्मिता सतीश पाटील ही विद्यार्थिनी ९१. ६७% गुण मिळवून संपूर्ण महाविद्यालयांतून प्रथम आली, तर सिमरन सिंग ही विद्यार्थिनी ९१. ३३% गुण मिळवून द्वितीय तर कु प्रणिती कुबल हिने ८८. ५०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. कु अस्मिता सतीश पाटील या विद्यार्थिनीने जीवशास्त्र या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले.

### वनस्पती शास्त्र विभागातर्फे महाविद्यालयीन संकुलामध्ये अभ्यास भेट

वनस्पती शास्त्र विभागाच्या डॉ ऊर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक यांनी २० जून २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या संकुलामध्ये अभ्यास भेट आयोजित केली होती. महाविद्यालयीन संकुलामध्ये विधि प्रकारची झाडे, औषधी वनस्पती यांचा समावेश आहे. या भेटीमुळे विद्यार्थ्याना संकुलामधील सामान्य वनस्पती ओळखण्यात



आणि आसपासच्या वनस्पतींशी परिचित होण्यास मदत झाली. या भेटीदरम्यान, वनस्पतीच्या रूपात्मक तपशीलाने त्यांच्या संकल्पना आणि शब्दावली पुनरुज्जीवित केली. विद्यार्थ्यांना वनस्पतींचे आर्थिक आणि औषधी महत्त्व देखील समजले. या अभ्यास भेटीला तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या वनस्पती शास्त्र विभागाचे ११ विद्यार्थी उपस्थित होते.

### वनस्पती शास्त्र विभागातर्फे 'कंपाऊंड मायक्रोस्कोपचा (सूक्ष्मदर्शक) वापर' यावर प्रशिक्षण सत्र

वनस्पती शास्त्र विभागाच्या डॉ ऊर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक यांनी २३ जून २०२२ रोजी, 'कंपाऊंड मायक्रोस्कोप (सूक्ष्मदर्शक)चा वापर' यावर प्रशिक्षण सत्र आयोजित केले होते. कोविड दरम्यान २ वर्षांपासून प्रयोगशाळेच्या प्रदर्शनापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मायक्रोस्कोपचे कौशल्य पुनरुज्जीवित करणे हा या सत्राचा मुख्य उद्देश होता. सूक्ष्मदर्शकाच्या विविध भागांची माहिती व त्यांचा वापर याबद्दल प्रात्यक्षिक देण्यात आले. प्रयोग शाळेतील विविध उपकरणे ज्यामध्ये वजनकाटा, इन क्यू बेटर, शे कर लॅमिनार एअर फ्लो यांचा वापर कसा करावा याबद्दल देखील प्रशिक्षण देण्यात आले. या सत्राला तृतीय वर्ष

विज्ञान शाखेच्या वनस्पती शास्त्र विभागाचे ११ विद्यार्थी उपस्थित होते.



**ग्रंथालय विभागातर्फे छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी**

ग्रंथालय विभागातर्फे २६ जून २०२२ रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या१४८ व्या जयंती निमित्त छत्रपती शाहू महाराज यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. डॉ ऊर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पती शास्त्र विभाग यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या एकूण कार्याचा थोडक्यात आढावा सादर केला.

**बा.ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालयात "Translation as a Career Option" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न**

बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय स्वायत्त यांची अनुबंध माजी विद्यार्थी संघटना व साहित्य सहवास यांच्या संयुक्त विद्यमाने ८ जुलै २०२२ रोजी "'Translation as a career option" या विषयावर डॉ. नरेंद्र गोळे, निवृत्त वरिष्ठ वैज्ञानिक-भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर यांचे व्याख्यान पाणिनी सभागृहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. मोजेस कोलेट यांनी केलेल्या प्रास्तविकाने झाली. यावेळी डॉ सुधाकर आगरकर, प्राध्यापक व अधिष्ठाता, व्ही.पी.एम. अकॅडेमी ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन अँड रिसर्च यांना देखील गौरवण्यात आले. त्यानंतर तृतीय वर्ष वनस्पती शास्त्र विभागाची विद्यार्थिनी कु. सुपर्णा हिने डॉ. नरेंद्र गोळे यांचा परिचय केला व त्यांच्या सादरीकरणास सुरुवात झाली. कु. श्रुती कोळी या विद्यार्थिनीने संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर कु. श्रावणी हिने केलेल्या आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात गोळे सरांनी विषयप्रवेश केला ज्यामध्ये अनुवाद म्हणजे काय, अनुवादक काय करतो, अनुवाद प्रक्रिया कशी असते, अनुवाद करण्याची आवश्यकता व अनुवाद करत असताना वापरण्यात येणाऱ्या संदर्भ पुस्तकांची थोडक्यात यादी त्यांनी सांगितली अनुवादामध्ये आवश्यक कौशल्ये त्यांनी विविध उदाहरणांदाखल मांडली त्यानंतर प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात विद्यार्थी व शिक्षक यांनी आपल्या शंकांचे निरसन केले.

या कार्यक्रमात बांदोडकर व जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे एकूण १२९ विद्यार्थी आणि २० शिक्षकवृंद उपस्थित होते.





**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**१ मे २०२२**

विद्या प्रसारक मंडळाच्या स्पोर्ट्स अकादमीतर्फे व्हीपीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या विद्या प्रसारक मंडळाच्या शिक्षकांसाठी, 'चालण्याचे आव्हान' या स्पर्धेचे आयोजन सकाळी ६.३० वाजता केले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार या स्पर्धेसाठी उपस्थित होत्या. सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहणासाठी देखील सहभागी झाल्या होत्या. व्हीपीएम स्पोर्ट्स अकादमीचा भव्य पारितोषिक वितरण सायंकाळी ५.०० वाजता झाला. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार उपस्थित होत्या.





डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांचा थिअरी ऑफ इव्हॉलुशन: सायन्स एज्युकेशन, स्कोप मंकी ट्रायल अँण्ड देअर आफ्टर बी.एन. बांदोडकर पीअर रिव्ह्यूड जर्नलसाठी शोधनिबंध स्वीकारण्यात आला आहे.

**महाविद्यालयीन व विद्यापीठ परीक्षा**

२ मे २०२२ पासून ऑफलाइन विद्यापीठ KT परीक्षा सुरू झाल्या. सत्र – ४ आणि सत्र –६ ची पूर्वतयारी परीक्षा दिनांक ५, ६, ७, आणि ९ मे रोजी घेण्यात आली. सत्र – १, ४ आणि ६ च्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या प्रश्नपेढीच्या तयारीच्या मिशनमध्ये कॉलेजने जोरदार सहभाग घेतला.

**६ मे – स्पर्धा परीक्षा आढावा बैठक**

माननीय सहसंचालक डॉ. संजय जगताप यांनी ६ मे २०२२ रोजी व्हीपीएमच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा आढावा बैठक बोलावली होती. श्री. विजय कदम यांनी राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना सुविधा देण्याचा सरकारचा उत्साही कार्यक्रम कसा राबवला आहे यावर भाष्य केले. युपीएससी आणि एमपीएससी मध्ये यशस्वीरीत्या दिसण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी पाठिंबा देण्याचे वचन दिले पाहिजे.

**पॉलिटेक्निक ग्रंथालय**

व्हीपीएम पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांच्या दयाळू हस्तक्षेपामुळे सकाळी अभ्यास करू इच्छिणाऱ्या कायद्याच्या विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निक लायब्ररीमध्ये बसविण्यात आले.

**प्राणी संरक्षा कायदा सर्टिफिकेट प्रोग्राम दुसरी बॅच**

व्याख्याने आणि नियोजित परीक्षा घेण्यात आल्या. ३१ मे रोजी निकाल जाहीर झाला. १९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. आमच्या महाविद्यालयातील पौर्णिमा भंडरी हिने हा अभ्यासक्रम पूर्ण करून ''ओ'' श्रेणी प्राप्त केली.



खालील विद्यार्थ्यांनी 'ओ' श्रेणी प्राप्त केली आहे.

१. पौर्णिमा भंडरी

२. दळी सुजाता

३. साकारिया सलोनी

४. निधी राव

पुढील बॅच सप्टेंबर २०२२ मध्ये सुरू होईल.

**''ॲड. श्रीनिवास ओक पुरस्कार''**

२०२२-२०२३ शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी एक नवीन पुरस्कार असेल. तृतीय वर्ष विधी मधील जास्तीत जास्त गुण मिळवून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना ॲड. श्री. श्रीनिवास वामन ओक पुरस्कार देण्यात येईल. आदरणीय श्रीमती वासंती श्रीनिवास ओक यांनी सदर पुरस्कार गुणवंत विद्यार्थ्यांसाठी स्थापित केला आहे. सदर पुरस्कारासाठी महाविद्यालय त्यांचे अत्यंत आभारी आहे. एलएल.बी. पदवी मध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुरस्कार रक्कम १२,५००/- देण्यात येईल.




**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर चर्चासत्र – १८ मे, २०२२**

डॉ. श्रीविद्या जयकुमार रामानंद आर्य डीएव्ही महाविद्यालयाने आयोजित केलेल्या, 'उच्च शिक्षणातील उत्कृष्टता समजून घेणे आणि प्रभावीपणे लागू करणे' या विषयावरील चर्चासत्रात सहभागी झाल्या होत्या.

**ग्रुप फोटो**

सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२१-२०२२ – अंतिम वर्षाचे विद्यार्थी, शिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी यांच्या समवेत क्लिक करून इतिहासाचा एक भाग झाले.





**सीईटी सेलकडे प्रतिनिधित्व**

वि.प्र.म चे ठा.म.पा विधी महाविद्यालय विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या इतर ६३ लॉ कॉलेजमध्ये सामील झाले आणि महाराष्ट्र राज्य सीईटी सेलला प्रथम वर्ष विधी प्रवेशांमध्ये होणाऱ्या मोठ्या विलंबामुळे शैक्षणिकांचे कधीही भरून न येणारे नुकसान आणि विद्यार्थी आणि महाविद्यालयांना होणाऱ्या अडचणींबाबत निवेदन पाठवले.

**२५ मे, २०२२**

ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांनी २५ मे २०२२ रोजी दुपारी २.३० वाजता माननीय प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री. अभय मंत्री यांच्या कार्यालयात बैठक बोलावली होती. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्या ठाणे जिल्हा विधी सेवा प्रधिकरणाच्या सदस्य म्हणून उपस्थित होत्या. माननीय सदस्य सचिव श्री. एम. आर. देशपांडे यांची बदली झाली आहे आणि म्हणून देशपांडे सरांनी प्रमुख जिल्हा न्यायाधीशचा कार्यभार सोपवला आणि सर्व सदस्यांचे आभार मानले.

**सतत कायदेशीर शिक्षण कार्यक्रम – बार-काउंन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा, रविवार, ८ मे २०२२**

**मला मूर्ख वाटत नाही, मला वाटते, अशिक्षित! – श्री. पासबोला.**

रविवार, ८ मे २०२२ रोजी, बार कौन्सिल ऑफ गोवा आणि महाराष्ट्र यांनी नियोजन भवन, ठाणे येथे ५ वर्षांपेक्षा कमी सराव असलेल्या वकिलांसाठी आणि कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय निरंतर कायदेशीर शिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. स्वागतपर भाषण करताना ॲड. श्री. पासबोला यांनी या सातत्यपूर्ण कायदेशीर शिक्षण कार्यक्रमाची थीम आणि कल्पना स्पष्ट केली, या लेखनाच्या सुरुवातीच्या टिप्पणीत, 'कायदा नेहमीच विकसित होत असतो' असे नमूद करून त्यांनी अशा कार्यक्रमांची गरज स्पष्ट केली.

बुद्धीचा अजिबात वापर न केल्यामुळे चढलेला गंज, तसेच बुद्धीचा अती वापर केल्यामुळे जमलेला गंडरुपी कर्ब; दोन्ही काढण्याकरिता Continuous Legal Education Programme उपयोगी आहे असे श्री. गजानन चव्हाण यांनी सांगितले.

माननीय न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय, श्रीमती अनुजा प्रभूदेसाई यांनी सत्राचे उद्घाटन केले. माननीय न्यायमूर्तींनी 'तुमच्यासमोर आणलेल्या कागदपत्रांमागील चेहरा ओळखण्याची गरज' यावर भर दिला. माननीय न्यायमूर्तींनी सुद्धा श्रोत्यांना प्रभावित केले, Be True to Your Self; तुम्ही तुमच्या स्वतःच्या विवेकाला उत्तरदायी आहात ! माननीय न्यायमूर्तींनी वकिलीच्या व्यवसायासाठी एक गुरू-मंत्रही दिला, ''उत्पन्न हे आकस्मिक आहे; ज्ञान आवश्यक आहे!'' आणि ''कष्ट-परिश्रम ही यशाची एकमेव गुरुकिल्ली आहे; तथ्यांवर प्रभुत्व मिळवा''.

पुण्यातील ज्येष्ठ-अधिवक्ता श्री. श्रीकांत कानिटकर यांनी 'सिव्हिल ट्रायलमधील पुरावे' याविषयी अतिशय सविस्तरपणे सांगितले. त्यांनी 'सिद्ध केलेले, सिद्ध झालेले, सिद्ध झालेले नाही' असे स्पष्ट केले.

दस्तऐवज तयार करणे पुरेसे नाही; त्यातील सामग्री सिद्ध करणे आवश्यक आहे. पुराव्याचे प्रकार : तोंडी, माहितीपट आणि इलेक्ट्रॉनिक. प्रवेश महत्त्वाचा आहे. लवाद हा निवडीचा न्यायाधीश असतो. प्रमाणित प्रतींसाठी अर्ज करणे आणि त्यासाठी पैसे देणे आवश्यक आहे. अनुमान : मे-प्रिझ्युम, शल-प्रिझ्युम आणि निर्णायक-पुरावा. सार्वजनिक-दस्तऐवज केवळ दुय्यम-पुराव्यांनी सिद्ध केले जाऊ शकते. दुय्यम-पुरावा कधी स्वीकारला जाऊ शकतो: कलम-६५. विक्री करार, नोंदणीकृत नसल्यास, स्वीकार्य नाही. कागदपत्रांवर योग्य शिक्का मारणे आवश्यक आहे: कलम-६४. दस्तऐवजांचे प्रमाणीकरण आणि अंमलबजावणी: कलम-६६ आणि कलम-६७.

**''पचेल ते खावं, रुचेल ते बोलावं, आणि पटेल ते मांडवं.''**

कलम ४५ आणि कलम ४७ सह कलम ६७ वाचणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील श्री. मकरंद आडकर यांनी 'फौजदारी कार्यवाही-तील परिस्थितीजन्य पुरावे' या विषयावर संवाद साधला. पुराव्याचे पंचशील म्हणून ५ सुवर्ण नियम (शरद सारडा प्रकरण).



ज्येष्ठ वकील श्री. राजीव पाटील, वकिलांच्या व्यावसायिक नैतिकतेबद्दल संबोधित केले. बार कौन्सिलकडे

नोंदणी केल्यावर, 'सनद' मिळाल्यावर प्रत्येक वकिलाला दिले जाणारे 'व्हाइट बुक' वाचण्याचे महत्त्व.

आमच्या आदरणीय प्राचार्य मॅडम, डॉ. श्री. विद्या यांनी दिलेल्या या शिकण्याच्या संधीसाठी आम्ही सर्वजण ऋणी आहोत.

**राजकीय मागासलेपणा – ऑनलाइन वेबिनार २ जून २०२२**

२ जून रोजी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना इतर मागासवर्गीय श्रेणी अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जागा राखीव ठेवण्यासाठी राजकीय मागासलेपणा ओळखण्यासाठी सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार स्थापन केलेल्या समर्पित आयोगासमोर आपले विचार मांडण्याची संधी मिळाली.

**जागतिक सायकल दिवस – ३ जून २०२२**

३ जून रोजी जागतिक सायकल दिन साजरा करण्यात आला. सायकलला प्रोत्साहन देत आमच्या विधी सहाय्यता कक्षाने फिटनेस आणि पर्यावरण संरक्षणाचा फायदा समोर आणला. कॉलेज कॅम्पसपासून आणि मागे ठाण्यात कॉलेज कॅम्पसजवळ सायकल रॅली काढण्यात आली होती. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्रा. श्री. अंबर जोशी यांनी महाविद्यालयाच्या वतीने संघाचे नेतृत्व केले. ही रॅली विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयांची होती. डॉ. महेश बेडेकर यांनी विद्या प्रसारक मंडळातर्फे हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरवात केली.



**जागतिक पर्यावरण दिवस – दिनांक ५ जून २०२२ रोजी**

दिनांक ५ जून २०२२ रोजी विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्यता कक्षाच्या वतीने कविता पर्यावरणाच्या या विषयावर कविता लेखन स्पर्धा ठेवण्यात आली होती. कवितांचे परीक्षण आणि प्रकाशन महाविद्यालयाच्या विधी सहाय्यता कक्षाचे प्रभारी सहाय्यक प्रा. विनोद ह. वाघ यांनी केले.

**छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन – ६ जून, २०२२**

६ जून, २०२२ हा दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्यात आला. दिवस भरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ठीक ९. ३० वाजता 'शिवज्योत रॅली' आयोजित करण्यात आली होती. पारंपरिक वेशभूषेत, ठाण्यातील तलावपाळी येथील छत्रपती महाराजांचा पुतळा ते महाविद्यालय अशी रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये शिवगर्जना देत व शिवज्योत प्रज्वलन करीत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्सवात सहभाग घेतला. विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यकारी सदस्यांपैकी काही सदस्य व महाविद्यालयातील प्राचार्य देखील ह्या समयी उपस्थित होते. सदर रॅलीची सांगता झाल्यानंतर महाविद्यालय परिसरातील पाणिनी सभागृहात ११.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्यावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत झाले. व नंतर महाराष्ट्र गीत देखील झाले. लघु चित्रपटादवारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रांचे वर्णन दाखविण्यात आले. महाराजाच्या शूर पराक्रमाचे वर्णन हे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात हस्तगत केलेले किल्ले, सिद्दी जोहरचा पराभव, तसेच शाहिस्तेखानाचा वध व राजा जयसिंगराव यांच्याकडून स्वतःची केलेली सुटका हे अप्रतिम रित्या दाखवण्यात

आले. महाराजांच्या चातुर्याचे विविध पैलू पाहण्यास मिळाले.



बा. ना बांदोडकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे वर्णन नाट्याद्वारे सादर केले. तसेच त्यांच्यापैकी विद्यार्थ्यांनी पोवाड्याद्वारे महाराज्यांच्या जन्मापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंतचे वर्णन केले. सदर कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. विजय बेडेकर यांनी उपस्थित पाहुण्यांचा सत्कार केला. माननीय श्री. राजेश नार्वेकर (जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी), श्री. राजू पाटील (प्रमुख, दहशतवाद विरोधी पथक), श्रीमती स्वाती इंदुलकर (इतिहासप्रेमी आणि चित्रपट निर्मात्या) व विद्या प्रसारक मंडळाचे सर्व कार्यकारी सदस्य आणि सर्व प्राचार्य हे ह्या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या कथा सांगून प्रेरणादायी संदेश दिला. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमाच्या अंती आभार प्रदर्शन करून पसायनाद्वारे कार्यक्रमाची सांगता झाली.



वि.प्र.मं.चे, ठा. म. पा. विधी महाविद्यालय, ठाणे ह्यांच्या वतीने सायंकाळी ६ वाजता शिवराज्याभिषेकाच्या दिनाचे औचित्य साधून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. भूषण राऊत सहाय्यक आयुक्त, ठाणे हे लाभले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी देखील विद्यार्थ्यांना संबोधित केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि आभार प्रा. विनोद ह. वाघ यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी भाग घेऊन त्यांचे कौशल्य दाखविले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध योजनांची व विचारांची विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी म्हणून सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे –**

१) छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक न्याय

२) छत्रपती शिवाजी महाराज आणि महिला कल्याण व संरक्षण

३) भारतीय संविधानातील राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे: छत्रपती शिवाजी महारांजाचा विचार

या स्पर्धेतील विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

१. विनायक वासुदेव शिवगण

२. कोमल जगताप

३. अक्षय राऊत



विधी महाविद्यालयाच्या परीक्षा चालू असताना देखील विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दुपारी ठिक ४.०० वाजता होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होण्याविषयी सूचना करण्यात आल्या होत्या, त्यासाठी सहभागी विद्यार्थ्यांची माहिती जाणून घेण्यासाठी गुगल फॉर्म देखील भरण्यास सांगण्यात आले होते.

## विधी महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव सोहळा ११ जून २०२२

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे म्युनिसिपल कौन्सिल विधी महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव सोहळा दिनांक ११ जून २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या प्रांगणातील थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे पार पडला. १९७२ मध्ये स्थापन झालेले ठाण्यातील पहिले विधी महाविद्यालय याने २०२२ मध्ये आपल्या कायदेशीर शिक्षण प्रसाराचा पन्नास वर्षांचा टप्पा पूर्ण केल्याच्या निमित्ताने या सुवर्ण महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे, मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती श्री श्रीराम मोडक तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री अनिल जोशी व श्री उमेश साळवी या कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. हे चारही माननीय न्यायमूर्ती हे विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. महाविद्यालयाच्या या सुवर्ण महोत्सव सोहळ्यानिमित्त ठाणे जिल्ह्यातील वरिष्ठ अधिवक्ताचा सत्कार करण्यात आला. यामध्ये श्री परशुराम पाटील, श्री. प्रमोद पाटील, श्री. व्यास, श्री. ए आर पितळे, श्री. अरुण नवरे आणि श्री. वाय एल दातार यांचा सत्कार विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आला. सुरुवातीला दीप प्रज्वलन करून मुख्य अतिथीनी कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर सर्वांनी राष्ट्रगीताचे गायन केले. डॉक्टर बेडेकर यांच्या हस्ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री संदीप शिंदे, श्री श्रीराम मोडक, श्री अनिल जोशी आणि श्री उमेश साळवी, तसेच ठाणे जिल्हा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री अभय मंत्री आणि महाराष्ट्र आणि गोवा अधिवक्ता मंडळाचे माजी अध्यक्ष ॲड. गजानन चव्हाण या सर्वांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळेस आमचे माजी विद्यार्थी आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग श्री. सुरेश बडगुजर आणि माजी प्राध्यापिका आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग श्रीमती लता सपकाळ हे पूर्णवेळ कार्यक्रमास उपस्थित होते.

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. विजय बेडेकर यांनी महाविद्यालयाचा पन्नास वर्षांचा प्रवास थोडक्यात विशद केला. महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थ्यांनी ह्या वेळेस आपले मनोगत व्यक्त केले ज्यामध्ये अधिवक्ता सुनिता कापरेकर, अधिवक्ता अंबर जोशी, माजी विद्यार्थी आणि न्यू लॉ कॉलेजचे माजी प्राचार्य श्री राजाध्यक्ष, दिवाणी न्यायाधीश श्रीमती शलाका जांभळे यांचा समावेश होता. अधिवक्ता ॲड.कगजानन चव्हाण यांनीही त्यांच्या महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणी यावेळेस आपल्या मनोगतात व्यक्त केल्या. अधिवक्ता मंडळाचे अध्यक्ष म्हणून व सदस्य म्हणून विधी महाविद्यालयास आवश्यक असलेली आणि कायद्याने अनुमती असलेली प्रत्येक गोष्ट करण्यास त्यांनी सहमती दर्शवली तसेच या महाविद्यालयाने त्यांना कशा प्रकारे शिक्षण घेण्यास मदत केली याचीही माहिती दिली.

यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व ग्रीन ट्रिब्यूनलचे माजी अध्यक्ष श्री उमेश साळवी यांनीही आपल्या महाविद्यालयीन जीवनाचा उजाळा सर्वांसमोर मांडला. विद्यार्थ्यांनी कशा प्रकारे अभ्यास करावा याचेही अनुभव त्यांनी सर्वांसमोर मांडले. यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री अनिल जोशी यांनीही विद्यार्थी म्हणून या महाविद्यालयाने त्यांना केलेली मदत आणि शिकवणे याची अनेक उदाहरणे देऊन स्वतःचे विद्यार्थी-जीवन सर्वांसमोर मांडले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री श्रीराम मोडक यांनी स्वतःच्या विधी शिक्षणात आलेल्या अडचणी व त्या सोडविण्यामध्ये महाविद्यालयांची भूमिका या सर्वांचा ऊहापोह यावेळेस प्रेक्षकांसमोर मांडला. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी

ध्येय तीच व्यक्ती गाठू शकते ज्यांच्या स्वप्नामध्ये उमेद असते.

दिलेल्या उत्तम शिकवणी बद्दल यांनी कौतुक केले. आजही या प्रांगणात कुठे काय आहे याची आठवण व माहिती असल्याची त्यांनी अनुभूती सांगितली. यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री संदीप शिंदे यांनीही नोकरी किंवा काम करत असलेल्या लोकांसाठी हे महाविद्यालय कशाप्रकारे पूरक आहे याचे स्व-उदाहरण दिले. त्यांनी सांगितले की, ते स्वतः काम करत असताना विधीचे शिक्षण पूर्ण करत होते व सायंकाळचे कॉलेज असल्यामुळे हे करणे त्यांना सहज शक्य झाले. श्री शिंदे यांनी त्यांच्या भाषणाचा शेवट कुसुमाग्रज यांच्या कणा या कवितेच्या माध्यमातून केला. या कार्यक्रमासाठी विद्या प्रसारक मंडळाचे सर्व विश्वस्त, तसेच विद्या प्रसारक मंडळाच्या इतर महाविद्यालयाचे सर्व प्रमुख उपस्थित होते. विधी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे संघटन विधी बंध याचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते व हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये त्यांचेही मोलाचे योगदान यावेळेस मिळाले.

विधी बंधचे अध्यक्ष अधिवक्ता सुनील परांजपे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद वाघ व अधिवक्ता राज नलगे यांनी एकत्रितरीत्या केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विधी बंधचे सर्व सदस्य या सर्वांनी खूप मेहनत घेतली. सदर कार्यक्रम हा विद्या प्रसारक मंडळाच्या यूट्यूब चैनल वरून प्रसारित करण्यात आला होता.



**पहिल्या वर्षाची मान्यता**

महाविद्यालयाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या माध्यमातून प्रथम वर्षापर्यंत केलेल्या सर्व २६२ प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे परत करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रथम वर्ष विधी अ, ब, क, ड च्या विद्यार्थ्यांसाठी २०, २१, २२ आणि २३ जून रोजी विद्यार्थ्यांना त्यांची मूळ कागदपत्रे परत करण्याकरिता वेळापत्रक देण्यात आले होते त्यानुसार त्यांना त्यांची मूळ कागदपत्रे परत करण्यात आली

**सेमिस्टर I परीक्षा**

२०२१-२०२२ बॅचचे एलएलबी प्रथम वर्षाचे विद्यार्थी या महिन्यात सेमिस्टर - I परीक्षेत बसले. विद्यापीठाने अधिसूचित केलेल्या वेळापत्रकानुसार १०, १३, १५ आणि १७ जून रोजी विद्यापीठाच्या सेम I परीक्षा घेण्यात आल्या.

**सेमिस्टर II व्याख्याने**

सेमिस्टर I च्या परीक्षेनंतर लगेचच २० जून रोजी सेमिस्टर II चे लेक्चर्स सुरू झाले. २४ जून रोजी सेम II च्या विद्यार्थ्यांना इंटर्नल आणि डीपीसी I वर प्रकल्प आणि वर्ग चाचण्या सादर करण्याच्या तारखांसह अधिसूचना जारी करण्यात आली.

एलएलबी सेम III चे निकाल विद्यापीठाने अधिसूचित केल्यानुसार २१ जून रोजी घोषित केले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**

२२ जून २०२२ रोजी, BRIMS ने न्यू एज्युकेशन पॉलीसी २०२२ या विषयावर विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांसाठी एक विचारमंथन चर्चासत्र आयोजित केले होते. श्री विनोद एच. वाघ कार्यशाळेला उपस्थित होते.

**ऑनस्क्रीन मार्किंग**

एलएलबी सेमिस्टर ५ आणि ६ चे ऑनलाइन

जग भित्र्याला घाबरवते आणि घाबरवणाऱ्याला घाबरते.

मूल्यांकन २५ जून रोजी विद्यापीठाकडे अविरत पाठपुरावा केल्यानंतर सुरू झाले. ९ जून रोजी सर्व परीक्षा संपल्या असून २५ जून २०२२ पर्यंत पेपर ऑनलाइन मूल्यांकनासाठी उपलब्ध करून देण्यात आले नव्हते.

**आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त विशेष कार्यक्रम २१ जून २०२२**

विप्रमंचे टिएमसी विधी महाविद्यालयाने दिनांक २१ जून २०२२ रोजी, सांय ६ वाजता आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये 'योग आसन शिकवणी आणि मार्गदर्शनाचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्रीमती रवदीप गांधी, श्री. सुखराम बिसेन आणि श्री. महेश दुधभाते हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. यावेळी श्री. महेश दुधभाते यांनी मनुष्याची दिनचर्या काय असली पाहिजे यावर मार्गदर्शन केले, तसेच काही महत्त्वाची योगासने करून दाखविली. श्री सुखराम बिसेन यांनीही अनेक योगासने करून दाखवली व ती करण्याची पध्दती व तिचे महत्त्व समजावून सांगितले. श्रीमती रवदीप गांधी यानी, 'योगा, मेडीएशन आणि क्रिया' या विषयावर मार्गदर्शन केले. विधी महाविद्यालयाचे जवळपास ५० विद्यार्थी यावेळेस उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी योगा आणि फिटनेस यावर एक संदेश दिला. विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्य कक्षाचे प्रभारी प्रा. विनोद एच वाघ यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.



**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**

**"इनोव्हेशन सेल २०२२"**

अ) स्मार्ट सिटी मिशन ने ७ वे वर्ष २५ जून २०२२ला देशभरात साजरा केला. ठाणे स्मार्ट सिटी कार्यक्रम हा त्यातील एक आहे. इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभागाच्या सौ. ऋजुता कांबळी यांनी द्वितीय वर्षीय इलेक्ट्रीकल विभागाच्या ५ विद्यार्थ्यांना –

१) पोखरण रोड २ मधील "Integrated Transport system"

२) हजुरी डाटा सेंटर (लुईसवाडी, ठाणे) येथील "Integrated command control"



वरील सेंटर वर 'स्मार्ट सिटी मिशन'चे प्रात्यक्षिक दाखविले.

ब) सौ. अर्चना कालिया (इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभाग) यांनी विद्यार्थ्यांसाठी (२५ जून २०२२)

१) स्मार्ट वॉटर मीटर रीडर

२) Air flow into the reader need to be stopped

३) To increase the accuracy level of the reader.

या वरील प्रश्नांची उत्तरे चर्चासत्रात विद्यार्थ्यांना मिळाली. वरील कार्यक्रम TMC-Pachpakadi येथे आयोजित केला होता.



क) सौ. वैशाली जोशी (इन्स्ट्रुमेन्टेशन विभाग) यांच्या मार्गदर्शनाने राष्ट्रीय पातळीवरील "Hackathon" (मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन) या विभागाने आयोजित केलेल्या प्रकल्प स्पर्धेत इन्स्ट्रुमेन्टेशन विभागाच्या श्रेयस आव्हाड, सौरभ दुबे, प्रेम बाऊसकर व तुषार शर्मा यांची अंतिम फेरी निवड झाली. सदर निकाल २४ जून २०२२ला सादर झाला. वरील विद्यार्थ्यांनी खालील प्रकल्पावर कार्य केले.

"Reconnaissance and Surveillance Drone with Beaco."

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

**जून २०२२ मधील कार्यक्रम / वार्ता**

१ जून : नोकरदार महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य या विषयावर प्रा. दीप्ती पेरीवाल यांचा एक लेख फेमिना मासिकात प्रकाशित झाला.

३ जून : जागतिक सायकल दिनानिमित्त डॉ. नीतिन



जोशी यांनी डॉ. पंकज नंदूरकर, श्री. परेश शिगवण, श्री. किशोर वाघमारे, श्री. दर्शन कोळी, श्री. स्वप्नील नाखवा या ब्रिम्स परिवारातील सदस्यांसह सायकल फेरी कार्यक्रमात सहभाग घेतला.

६ जून : पाणिनी येथे विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांतर्फे आयोजित शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याला संचालक डॉ. नीतिन जोशी, तसेच प्राध्यापक वर्ग आणि इतर सदस्य ब्रिम्स परिवारातर्फे उपस्थित राहिले.





७ जून : डॉ. नीतिन जोशी, वि. प्र. म. संस्थेच्या प्राचार्यांच्या बैठकीला उपस्थित राहिले.

१० जून : डॉ. नीतिन जोशी समिती सदस्यांसह कॉलेज डेव्हलपमेंट कमिटी (CDC) बैठकीला उपस्थित राहिले. डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी कॉलेज डेव्हलपमेंट कमिटी (CDC) बैठकीत शैक्षणिक प्रगती, IQAC आणि NBA याविषयी अद्ययावत स्थितीची माहिती सादर केली. डॉ. पंकज नंदूरकर यांनी उद्योग आणि संस्था यांच्यातील संवाद सादर केला.

११ जून : डॉ. नीतिन जोशी यांनी ठाणे व्यवस्थापन संघटनेच्या सदस्यांसोबत बैठक घेतली.

११ जून : डॉ. नीतिन जोशी यांनी बीएमएकडून दांडेकर करंडक स्वीकारला.



११ जून: डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी मार्गदर्शक डॉ. सचिन वेर्णेकर यांच्यासोबत डॉ व्ही एन ब्रिम्स, एन बी ए (NBA) च्या मुख्य समितीच्या मार्गदर्शन बैठकीसाठी दूरस्थ माधयमाद्वारे समन्वय साधला जेथे सर्व सदस्यांनी NBA तयारीची प्रगती सादर केली.




१५ जून : प्रा. विभूती सावे यांची परीक्षा नियंत्रक सचिव (अभ्यास मंडळ), प्रेस्टिज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, ग्वाल्हेर तर्फे, ऑपरेशन्स आणि सप्लाय चेन मॅनेजमेंट या विषयासाठी प्रश्नपत्रिका रचनाकार (पेपर सेटर) म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१५ जून: एम एम एस – २०२१ – २३ सत्र – १ ले निकाल जाहीर झाला.

एम एम एस – २०२१ – २३ सत्र – १ ले, नियमित परीक्षा – विभागीय प्रथम क्रमांक

| तुकडीचे/ विभागाचे नाव | चाणक्य | पराशर | वशिष्ठ |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांचे नाव | घडी ऐश्वर्या आनंद  | जोशी रोहीन अश्विन  | कदम तन्वी संजय  |

१८ जून : प्रशिक्षक संघटने तर्फे डॉ. नीतिन जोशी यांना, लोणावळा येथे ACT आणि TACT नावाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले.






१८ जून: डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे एमबीए आणि एमएमएस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले गेले आणि प्रशिक्षकाच्या कौशल्यपूर्ण मार्गदर्शनाचा ६० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.




१८ जून: डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी डॉ व्ही एन ब्रिम्स तर्फे आयोजित केलेल्या एम एम एस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य मार्गदर्शन सत्रांच्या प्रचारात्मक मालिकेचा एक भाग म्हणून आयोजित CET मार्गदर्शन सत्रामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२१ जून : प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी FIIB बिझनेस रिव्ह्यू या स्कोपस आणि ए बी डी सी अनुक्रमित नियतकालिकासाठी ''ठेव विम्यामध्ये पन्नास वर्षांचे संशोधन'' या शीर्षकाच्या शोधनिबंधाचे समीक्षण केले.

२१ जून :आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, डॉ. पल्लवी चांदवसकर, प्रा. सिद्धेश सोमण आणि डॉ. कांचन अक्षय यांनी ब्रिम्सच्या प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांसाठी, आयुष सरकार द्वारे प्रमाणित योग प्रशिक्षक.डॉ. पल्लवी चंदवासकर, सुश्री प्राजक्ती शास्त्री आणि सुश्री डेझी गरुड यांच्या मार्गदर्शनाने योगासन (कॉमन योग प्रोटोकॉल) आणि योग दिन कार्यक्रमांचे आयोजन केले.








२१ जून : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भित्ती चित्र (पोस्टर मेकिंग) स्पर्धा घेण्यात आली.

अनुक्रमे vidyarthini रुतुजा जाधव आणि प्रा. जान्हवी पोतदार यांनी तयार केलेली भित्ती चित्रे.




विद्यार्थिनी – ऋतुजा जाधव



प्रा. जान्हवी पोतदार

२२ जून : डॉ. नीतिन जोशी यांना पीटीव्हीए येथे सहयोगी प्राध्यापक पदाच्या मुलाखतींसाठी विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

२२ जून : डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP)' या विषयावर कार्यशाळा घेतली. कार्यशाळेला वि. प्र. म. च्या शिक्षण संस्थांचे प्रमुख आणि प्राध्यापक उपस्थित होते.



३० जून : डॉ. नीतिन जोशी यांना PTVA येथे संचालकांच्या मुलाखतीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.